रायगड, नवी मुंबई
# राम प्रहर
◆ वर्ष १७ ◆ अंक ३२
www.ramprahar.com
रविवार, १८ ऑगस्ट २०२४ ◆ पाने ८ ◆ किंमत ₹ २

## केंद्र सरकारकडून महाराष्ट्रासाठी तीन मोठे निर्णय



**नवी दिल्ली** : केंद्र सरकारच्या मंत्रिमंडळ बैठकीत महाराष्ट्राच्या विकासासंदर्भात अनेक महत्त्वाचे निर्णय घेण्यात आले आहेत. या बैठकीत पुणे मेट्रो, ठाणे इंटिग्रल रिंग मेट्रो प्रकल्पाला मंजुरी देण्यात आली आहे. यात वाढवण बंदराचाही समावेश आहे. केंद्राने वाढवण बंदरासाठी ७६ हजार २०० कोटींचा निधी मंजूर केला आहे. पुण्यातील मेट्रो फेज-१ प्रकल्पाच्या विस्ताराला केंद्र सरकारने मंजुरी दिली आहे. या प्रकल्पासाठी एकूण २,९५४.५३ कोटी रुपये लागणार असून तो २०२९पर्यंत कार्यान्वित होणार आहे. याशिवाय जवळपास १२,२०० कोटी खर्चाच्या ठाणे इंटिग्रल रिंग मेट्रो रेल्वे प्रकल्पाला केंद्रीय मंत्रिमंडळाने मंजुरी दिली आहे. केंद्र सरकारच्या या निर्णयाचे मुख्यमंत्री एकनाथ शिंदे, उपमुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस व अजित पवार यांनी स्वागत केले आहे.

### अंतरंग
पावसाच्या उघडीपीमुळे भात पिकावर खोडकिड्याचा प्रादुर्भाव/२
'रविप्रहर'मध्ये वाचा विविध विषयांवरील लेख/४
जिल्हास्तरीय जलतरण स्पर्धेत रोहित कुथे अव्वल/८

### मुख्यमंत्री माझी लाडकी बहीण योजनेचा शानदार शुभारंभ

# रक्षाबंधनाची ओवाळणी मिळाल्याने महिलांमध्ये उत्साहाचे वातावरण

**पुणे : प्रतिनिधी**

महिलांच्या ढोल आणि लेझीम पथकाचे सादरीकरण, उत्सवाच्या वातावरणात सजलेला आणि महिला भगिनींनी फुललेला शिवछत्रपती क्रीडानगरीचा परिसर, महिलांच्या चेहऱ्यावर ओसंडून वाहणारा आनंद आणि मुख्यमंत्री-उपमुख्यमंत्र्यांनी महिलांना दिलेल्या शुभेच्छा अशा उत्साहपूर्ण वातावरणात मुख्यमंत्री लाडकी बहीण योजनेचा पुणे येथे राज्यस्तरीय शुभारंभ शनिवारी (दि. १७) करण्यात आला.

म्हाळुंगे-बालेवाडी येथील श्री शिवछपत्रपती क्रीडानगरीत झालेल्या या सोहळ्याला केंद्रीय राज्यमंत्री मुरलीधर मोहोळ, उपमुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस व अजित पवार, सहकारमंत्री दिलीप वळसे-पाटील, उच्च व तंत्र शिक्षणमंत्री चंद्रकांत पाटील, विधान परिषदेच्या उपसभापती डॉ. नीलम गोऱ्हे, महिला व बाल विकासमंत्री आदिती तटकरे आदी उपस्थित होते.

मुख्यमंत्री शिंदे म्हणाले की, महिलांना योजनेचे अर्ज भरण्यासाठी ३१ ऑगस्टपर्यंत मुदत आहे. अर्ज भरल्यानंतर त्यांना जुलै, ऑगस्ट, सप्टेंबर महिन्याची एकत्रित रक्कम त्यांच्या बँक खात्यावर जमा करण्यात येईल. काही महिलांचे बँक खाते आधार क्रमांकाशी जोडले गेल्यानंतर त्यांच्या खात्यात रक्कम जमा होईल. प्रत्येक पात्र भगिनीला योजनेचा लाभ दिला जाईल. लाखो बहिणींच्या खात्यात दर महिन्याला निश्चित रक्कम जाईल याचे खूप समाधान आहे.

महिला भगिनींसाठी मुख्यमंत्री अन्नपूर्णा योजनेच्या माध्यमातून वर्षाला तीन गॅस सिलिंडर मोफत देण्याचा निर्णय घेतला. भावालाही मदत करण्यासाठी मुख्यमंत्री युवा कार्य प्रशिक्षण योजना सुरू केली. सर्वांच्या जीवनात सुखाचे क्षण यावे यासाठी कल्याणकारी योजना राबविण्यात येत आहेत. जनतेची सेवा हेच शासनाचे ध्येय असून प्रत्येक योजना या दृष्टीनेच गतीने राबविण्यात येत आहे, असेही मुख्यमंत्र्यांनी सांगितले.

या वेळी मुख्यमंत्री, उपमुख्यमंत्र्यांच्या हस्ते प्रातिनिधिक स्वरूपात योजनेच्या धनादेश, स्मार्टकार्डचे वाटप करण्यात आले.




### महिलांचा सन्मान करणारा महाराष्ट्र घडवून दाखवू -उपमुख्यमंत्री फडणवीस

राज्याच्या अर्थव्यवस्थेत महिलांची भागीदारी असावी असा केंद्र आणि महाराष्ट्र शासनाचा प्रयत्न आहे. यामुळे महाराष्ट्राची अर्थव्यवस्थाही वेगाने वाढणार असून महिलांचा सन्मान करणारा महाराष्ट्र घडवून दाखवू, अशी ग्वाही उपमुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांनी दिली. मुख्यमंत्री लाडकी बहीण योजनेसाठी मार्च २०२५पर्यंतची तरतूद केली असून पुढेही दरवर्षी अर्थसंकल्पात तरतूद केली जाईल, असेही ते म्हणाले.

### भावांकडून बहिणींना ओवाळणी -उपमुख्यमंत्री पवार

उपमुख्यमंत्री अजित पवार म्हणाले, राज्यातील महिलांना अधिक सक्षम, सबल करण्यासाठी त्यांना मान, सन्मान प्रतिष्ठा मिळवून देण्याकरिता अर्थसंकल्पात मुख्यमंत्री माझी लाडकी बहीण योजना सुरू करण्यात आली. या योजनेला माता-भागिनींकडून उत्स्फूर्त प्रतिसाद लाभत आहे. आजपर्यंत एक कोटी तीन लाख रुपये माता-भागिनींच्या बँक खात्यात जुलै व ऑगस्ट महिन्याचे मिळून तीन हजार रुपये जमा करण्यात आले आहे. या महिलांच्या चेहऱ्यावर आनंद, समाधान, हसू दिसून येत आहे. रक्षाबंधन सणानिमित्ताने ओवाळणी म्हणून भेट दिली आहे.

### योजनेच्या माध्यमातून लाखो बहिणी मिळाल्या -मुख्यमंत्री शिंदे

आजचा दिवस लाडक्या बहिणींच्या आयुष्यातला आनंदाचा क्षण आहे, असे नमूद करून मुख्यमंत्री एकनाथ शिंदे या वेळी म्हणाले, मुख्यमंत्री माझी लाडकी बहीण योजनेच्या माध्यमातून लाखो बहिणी मिळाल्या याचा मनापासून आनंद आहे. त्यांचे प्रेम ही जीवनातील मोठी शिदोरी आहे. या योजनेसाठी पूर्ण वर्षाचे आर्थिक नियोजन करण्यात आले आहे. या दीड हजार रुपयांचे मोल गरजू बहिणींसाठी खूप आहे. त्यांना या रकमेतून कुटुंबाच्या गरजा पूर्ण करण्यासोबत आर्थिक उन्नती साधता येईल. आता मदतीसाठी कुणासमोर हात फैलावे लागणार नाही.

*दोन दिवसांनी रक्षाबंधन साजरा होणार आहे. मुख्यमंत्री, उपमुख्यमंत्री अशा तीन लाडक्या भावांनी आधीच ओवाळणी दिली. एक कोटी ३५ लाख महिला लाभासाठी पात्र ठरल्या. त्यापैकी एक कोटी तीन लाख महिलांच्या बँक खात्यावर रक्कम जमा झाली आहे. दोन कोटींपेक्षा अधिक महिलांना लाभ देण्याचा प्रयत्न आहे.*

**-आदिती तटकरे, महिला व बाल विकासमंत्री**

## पनवेलमध्ये आज लाडक्या बहिणींचे लाडके देवाभाऊ कार्यक्रम

**पनवेल : रामप्रहर वृत्त**



महिला सक्षमीकरणाच्या दृष्टिकोनातून राज्यातील महायुती सरकारच्या माध्यमातून मुख्यमंत्री माझी लाडकी बहीण योजना यशस्वीपणे राबविण्यात आली आहे. त्या अनुषंगाने महिलांच्या भावना जाणून घेण्यासाठी राज्याचे उपमुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस हे दूरदृष्य प्रणालीद्वारे थेट संवाद साधणार असून या संदर्भात उत्तर रायगड जिल्हा महिला मोर्चाच्या वतीने रविवारी (दि. १८) सायंकाळी ५ वाजता पनवेल शहरातील विरूपाक्ष मंगल कार्यालयात लाडक्या बहिणींचे लाडके देवाभाऊ हा कार्यक्रम आयोजित करण्यात आला आहे.

या कार्यक्रमास प्रमुख मान्यवर म्हणून लोकप्रिय आमदार प्रशांत ठाकूर, आमदार महेश बालदी, भाजपचे उत्तर रायगड जिल्हाध्यक्ष अविनाश कोळी, जिल्हा सरचिटणीस नितीन पाटील, प्रकाश बिनेदार, चारुशीला घरत, दीपक बेहेरे, पनवेल तालुका अध्यक्ष अरुणशेठ भगत, शहर अध्यक्ष अनिल भगत, महिला मोर्चाच्या जिल्हाध्यक्ष अश्विनी पाटील यांच्यासह महिला मोर्चाच्या इतर पदाधिकारी उपस्थित राहणार आहेत.

महिला सक्षमीकरणासाठी महायुती सरकारने घोषित केलेल्या लाडकी बहीण योजनेचे पहिले दोन हप्ते बहिणींच्या खात्यात जमा झाले आहेत. त्या अनुषंगाने या योजनेबद्दल माता-भगिनींच्या मनातील भावना जाणून घेण्यासाठी उपमुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस राज्यातील लाडक्या बहिणींशी संवाद साधणार आहेत. भाजप महिला मोर्चाने या उपक्रमाला व्यापक स्वरूप देण्यासाठी पुढाकार घेत लाडक्या बहिणींचे लाडके देवाभाऊ कार्यक्रम आयोजित केला आहे. या कार्यक्रमास लाडक्या बहिणींनी उपस्थित रहावे, असे आवाहन महिला मोर्चाच्या वतीने करण्यात आले आहे.

## मुंबईत निवडणूक अधिकाऱ्यांची नियुक्ती

**मुंबई** : विधानसभा निवडणुकीच्या पार्श्वभूमीवर केंद्रीय निवडणूक आयोगाच्या मान्यतेने मुंबई महापालिका क्षेत्रातील ३६ विधानसभा मतदारसंघांसाठी मिळून एकूण सहा अतिरिक्त जिल्हा निवडणूक अधिकाऱ्यांची नियुक्ती करण्यात आली आहे. राज्य शासनाचे मुख्य निवडणूक अधिकाऱ्यांनी याबाबतचे आदेश जारी केले आहेत. निवडणूक आयोगाने बृहन्मुंबई महापालिका क्षेत्रासाठी जिल्हा निवडणूक अधिकारी म्हणून महापालिका आयुक्तांकडे यापूर्वीच जबाबदारी सोपवली आहे.

## निवडक

### विनेश फोगट मायदेशी परतली, जोरदार स्वागत

**नवी दिल्ली** : भारताची गोल्डन गर्ल म्हणून तमाम भारतीयांच्या मनात जागा मिळवणारी विनेश फोगट शनिवारी (दि. १७) मायदेशात परतली. १०० ग्रॅम वजन वाढल्याने पॅरिस ऑलिम्पिकमध्ये अंतिम फेरी गाठूनही विनेश पदकाला मुकली. दिल्ली विमानतळावर चाहत्यांनी विनेशचे जोरदार स्वागत केले. या वेळी तिला अश्रू अनावर झाले. विनेशचे हरियाणातील तिच्या मूळ गावीही चॅम्पियनप्रमाणे स्वागत झाले. **(सविस्तर वृत्त पान ८ वर..)**

### तुर्कस्तानच्या संसदेत राडा; खासदारांमध्ये हाणामारी

**अंकारा** : तुर्कस्तानच्या संसदेमध्ये सत्ताधारी आणि विरोधी पक्षाच्या सदस्यांमध्ये हाणामारी झाल्याचे समोर आले आहे. संसदेत एका विषयावर चर्चा सुरू असताना सत्ताधारी आणि विरोधी पक्षाच्या सदस्य काही सदस्यांमध्ये आधी आरोप-प्रत्यारोप आणि शाब्दिक वाद झाला. त्यानंतर वाद वाढून त्यांचे रूपांतर हाणामारीत झाले.




(अधिक छायाचित्रे पान ८ वर..)

## महायुती सरकारच्या योजना अविरत सुरू राहतील -आमदार प्रशांत ठाकूर

**पनवेल : रामप्रहर वृत्त**

महाराष्ट्रात महायुती सरकारने सुरू केलेल्या योजना या अविरतपणे सुरूच राहतील आणि त्यांचा फायदा प्रत्येक लाभार्थ्याला होईल, मात्र महायुती सरकारने लोकांच्या हितांसाठी सुरू केलेल्या योजनांचा अपप्रचार महविकास आघाडीकडून सुरू आहे. त्यामुळे महायुतीने समाज कल्याणासाठी सुरू केलेल्या या योजनांची माहिती कार्यकर्त्यांनी प्रत्येक नागरिकापर्यंत जागरूकपणे पोहचवावी, असे आवाहन आमदार प्रशांत ठाकूर यांनी शनिवारी (दि. १७) केले.

आगामी विधानसभा निवडणुकीच्या पार्श्वभूमीवर भाजप पनवेल शहर विस्तारित कार्यकारिणीची बैठक खांदा कॉलनीतील श्रीकृपा हॉलमध्ये आमदार प्रशांत ठाकूर यांच्या प्रमुख उपस्थितीत आणि शहर अध्यक्ष अनिल भगत यांच्या अध्यक्षतेखाली झाली. त्या वेळी ते कार्यकर्त्यांना मार्गदर्शन करताना बोलत होते.

या बैठकीला भाजप उत्तर रायगड जिल्हाध्यक्ष अविनाश कोळी, प्रदेश कार्यकारिणी सदस्य बाळासाहेब पाटील, सरचिटणीस विक्रांत पाटील, जिल्हा सरचिटणीस नितीन पाटील, ॲड. प्रकाश बिनेदार, दीपक बेहेरे, चारुशीला घरत, चिटणीस रमेश मुंडे, ब्रिजेश पटेल, अमरीश मोकल, माजी महापौर डॉ. कविता चौतमोल, माजी उपमहापौर सीताताई पाटील, माजी सभागृह नेते परेश ठाकूर, माजी नगराध्यक्ष सुनील घरत, संदीप पाटील, माजी नगरसेवक एकनाथ गायकवाड, माजी नगरसेविका दर्शना भोईर, ॲड. वृषाली वाघमारे, सुशीला घरत, हेमलता म्हात्रे, नीता माळी, **(पान २ वर..)**

## महिला डॉक्टर अत्याचार, हत्येच्या निषेधार्थ खोपोलीत कॅंडल मार्च

**खोपोली : प्रतिनिधी**

कोलकाता येथील प्रशिक्षणार्थी डॉक्टर तरुणीवर अत्याचार व हत्येच्या निषेधार्थ खोपोलीत शुक्रवारी (दि. १६) सायंकाळी भाजप महिला मोर्चातर्फे कॅण्डल मार्च काढण्यात आला होता. यामध्ये शहरातील नामवंत डॉक्टरांनीही सहभाग घेतला.

कोलकाता येथे ड्युटीवर असलेल्या डॉक्टर तरुणीवर बलात्कार करून तिची निर्घृण हत्या करण्यात आली. या घटनेने पश्चिम बंगालसह देश हादरून गेला. देशभरातील रुग्णालयांमध्ये डॉक्टरांनी संप करून या घटनेचा निषेध केला व आरोपीला कडक शिक्षा करावी, अशी मागणी केली. या घटनेच्या पार्श्वभूमीवर खोपोलीत भाजप महिला मोर्चा उत्तर रायगड जिल्हाध्यक्ष अश्विनी पाटील यांच्या उपस्थितीत शहराध्यक्ष अश्विनी अत्रे यांच्या नेतृत्वाखाली कॅंडल मार्च काढण्यात आला. **(पान २ वर..)**




## सौ. शकुंतला रामशेठ ठाकूर स्कूलमध्ये इन्वेस्टीचर समारंभ

### मान्यवरांच्या उपस्थितीत विविध कार्यक्रम सादर



**उलवे नोड : रामप्रहर वृत्त**

रयत शिक्षण संस्थेच्या उलवे नोड येथील सौ. शकुंतला रामशेठ ठाकूर स्कूलमध्ये द्वितीय इन्वेस्टीचर समारंभाचे आयोजन शनिवारी (दि. १७) करण्यात आले होते. या वेळी सांस्कृतिक कार्यक्रम सादर झाले.

'रयत'चे मॅनेजिंग कौन्सिल सदस्य, माजी खासदार लोकनेते रामशेठ ठाकूर यांच्या अध्यक्षतेखाली झालेल्या या समारंभास प्रमुख पाहुणे म्हणून पनवेल पंचायत समितीचे गटशिक्षण अधिकारी सीताराम मोहिते, शकुंतला ठाकूर, स्कूलचे चेअरमन परेश ठाकूर, 'रयत'चे जनरल बॉडी सदस्य वाय.टी. देशमुख, रायगड विभागीय निरीक्षक मोहन कोंगेरे, उपनिरीक्षक विलासराव जगताप यांच्यासह खारघरच्या रामशेठ ठाकूर पब्लिक स्कूलच्या मुख्याध्यापिका राज अलोनी, कामोठे येथील लोकनेते रामशेठ ठाकूर पब्लिक स्कूलचे मुख्याध्यापक अविनाश कुलकर्णी, इंग्लिश मीडियम स्कूल व ज्युनिअर कॉलेजच्या मुख्याध्यापिका स्वप्नाली म्हात्रे, भाजप उलवे नोड १चे अध्यक्ष निलेश खारकर, कविता खारकर, स्कूलच्या मुख्याध्यापिका मुक्ता खटावकर, शिक्षक-शिक्षकेतर कर्मचारी, पालक, विद्यार्थी उपस्थित होते.

मान्यवरांच्या हस्ते दीप प्रज्वलनाने कार्यक्रमास सुरुवात झाली. यानंतर विद्यार्थ्यांनी रयत गीत व स्वागत गीत गाऊन उपस्थितांची मने जिंकली. स्वागतपर नृत्यही सादर करण्यात आले. क्रीडा शिक्षक संग्राम फोफेरकर आणि संगीत शिक्षक हर्षल फडके यांच्या प्रशिक्षणातून बँड पथकामार्फत विद्यार्थी संचलन करून स्टेजवर आले. त्यांना मान्यवरांकडून शपथ, स्लॅश व बॅच देण्यात आला. **(पान २ वर..)**

## कळंबोली सर्कल येथे तेलाचा कंटेनर उलटला

**कळंबोली, पनवेल : वार्ताहर**

तळोजा औद्योगिक वसाहतीतील गॅलेक्सी कंपनीमधून जेएनपीएमार्गे थायलंडला जाणाऱ्या टॅक्सीन ऑइलने भरलेला कंटेनर कळंबोली सर्कल येथे समोरून येणाऱ्या ट्रकवर आदळला व उलटला. त्यामुळे कंटेनरमधील ऑइल रस्त्यावर पसरले. हा अपघात शनिवारी (दि. १७) सकाळी ७च्या सुमारास झाला.

रसायनमिश्रित ऑईलवरून वाहने गेल्याने इतर वाहनांच्या टायरला लागून ते दूरवर गेले. दरम्यान, पाले बुद्रुक गावात राहणारी १९ वर्षीय राजनंदिनी रमेश जाधव हिचा खांदेश्वर परिसरात दुचाकी घसरून मृत्यू झाला.

# महिला डॉक्टर अत्याचाराविरोधात अलिबागमध्ये डॉक्टरांची निदर्शने




**अलिबाग : प्रतिनिधी**

डॉक्टरांवरील हल्ले रोखण्यासाठी देशभरात कठोर कायदा अस्तित्वात आणा या मागणीसाठी रायगड जिल्ह्यातील डॉक्टरांनी शनिवारी (दि. १७) एक दिवसीय संप पुकारला होता. कोलकाता येथील महिला डॉक्टराच्या हत्येचा निषेध करण्यासाठी जिल्हाधिकारी कार्यालयासमोरील हीराकोट तलाव येथे निदर्शनेही करण्यात आली.

कोलकत्ता येथील आर जी कार वैद्यकीय महाविद्यालयात महिला डॉक्टरवर अत्याचार आणि हत्या करण्यात आली. या घटनेच्या निषेधार्थ रायगड जिल्ह्यातील सर्व खासगी डॉक्टरांनी एक दिवस आपले रुग्णालये आणि दवाखाने बंद ठेवले. आपत्कालीन सेवा वगळता इतर सर्व वैद्यकीय सेवा बंद ठेवण्यात आल्या होत्या.

इंडीयन मेडीकल असोसिएशन, रायगड मेडीकल असोसिएशन आणि अलिबाग मुरूड मेडीकल असोसिएशनचे डॉक्टर्स या आंदोलनात सहभागी झाले होते. सकाळी सव्वा अकराच्या सुमारास त्यांनी जिल्हाधिकारी कार्यालयासमोर निदर्शने केली. यानंतर निवासी जिल्हाधिकाऱ्यांना संघटनांच्या वतीने निवेदन देण्यात आले.

वैद्यकीय अधिकाऱ्यांवरील हल्ले रोखण्यासाठी देशपातळीवर एकच कायदा अस्तित्वात असावा, ज्यात ओरोपींविरोधात कठोर शिक्षेची तरतूद असावी, रुग्णालयांमधील सुरक्षा व्यवस्था बळकट करण्यात यावी, अशी मागणी या वेळी करण्यात आली.

# पावसाच्या उघडीपीमुळे भात पिकावर खोडकिड्याचा प्रादुर्भाव

**कर्जत : प्रतिनिधी**

कर्जत तालुक्यात यंदा भाताचे पीक चांगले आले आहे, मात्र श्रावण महिना सुरू झाला आणि पावसाने उघडीप दिली. त्यामुळे भात पिकावर खोडकिड्याचा प्रादुर्भाव झाला असून शेतकरी राजा चिंतित झाला आहे. कृषी विभागाने खोडकिडा नियंत्रणात आणण्यासाठी महत्त्वपूर्ण माहिती प्रसारित केली आहे.

कर्जत तालुक्यात यंदा साडे नऊ हजार हेक्टर जमिनीवर भाताची शेती केली आहे. खरीप हंगामात बहुसंख्य शेतकरी भात शेती करीत असतात. पावसाच्या उघडीपीमुळे भात पिकावर किडींचा प्रादुर्भाव होण्याचे प्रमाण वाढते. यावर्षी जुलै महिन्यात चांगला पाऊस झाल्याने भात शेतीची कामे वेळेत झाली. त्यामुळे भात पीकही चांगले येईल असे वाटत असताना श्रावण महिन्यात उन पावसाचा खेळ सुरू झाला आणि भात पिकावर खोडकिडीचा प्रादुर्भाव होऊ लागला. खोडकिडा नियंत्रणात आणण्यासाठी कीटक नाशकाची फवारणी करावी, असे कृषी विभागाकडून सांगण्यात येत आहे.



### भात पिकावर पडणारे रोग

*करपा, खोडकिडा, कडा करपा, लष्कर आळी, गाद माशी, पिवळा खोडकिडा, निळे भुंगे, तपकीर तुडतुडे आणि पूर्व कोष करपा*

**खोडकिडा नियंत्रणात आणण्यासाठी शेतात खोडकिडा झालेल्या ठिकाणी कार्पेट हायड्रो क्लोराईड या कीटनाशकाची फवारणी करावी. प्रति एकर दोनशे ग्राम कीटकनाशक लागेल. फवारणीनंतर शेतकऱ्यांनी कृषी अधिकाऱ्यांशी संपर्क साधून पाहणीस बोलवून पुढील सल्ला घ्यावा.**

**–रामदास तुपे, कृषी साहित्य व औषध विक्रेते**

**ज्या भागात भात पिकावर खोडकिड्याचा प्रादुर्भाव आहे. त्या भागातील शेतकऱ्यांनी कृषी विभागाशी संपर्क साधावा आणि सल्ला घ्यावा. कृषी सहाय्यक व कृषी पर्यवेक्षकांना भेटी देण्याचा सूचना देण्यात आल्या आहेत.**

**–अशोक गायकवाड, कृषी अधिकारी, कर्जत**

## निवडक

### पनवेल ते गव्हाण बसची मागणी



**उरण :** महाराष्ट्र नवनिर्माण सेना उलवे नोड गव्हाण विभागातील पदाधिकाऱ्यांनी पनवेल ते उलवे नोड–गव्हाण अशी बस चालु करण्यात यावी, अशी मागणी केली आहे. यासाठी त्यांनी फेब्रुवारी महिन्यात आगार प्रमुखांना तसे निवेदनही दिलेले आहे. त्या अनुषंगाने आज पनवेल आगार प्रमुख सुहास चौरे आणि निरीक्षक ज्ञानेश्वर म्हात्रे यांची भेट घेऊन मनसेतर्फे त्यांना स्मरणपत्र देण्यात आले. पनवेल ते उलवे नोड–गव्हाण अशी बस चालु करण्यात यावी, अशी मागणी करण्यात आली. या वेळी उलवे शहर अध्यक्ष राहुल बाबुराव पाटील, पनवेल तालुका उपाध्यक्ष निर्दोष केशव गोंधळी, उलवे गाव शाखा उपाध्यक्ष संदीप म्हात्रे व ॲड. शुभम मढवी उपस्थित होते.

### लक्ष शूटिंग क्लबतर्फे स्वच्छता मोहीम

**माथेरान :** लक्ष शूटिंग क्लब पनवेल संस्थेच्या वतीने माथेरान सनसेट पॉईंट परिसरात स्वच्छता मोहीम राबविण्यात आली. संस्थेचे शिक्षक सिद्धार्थ शिशूर आणि त्यांचे सर्व विद्यार्थी यांनी मिळून पॉईंटची स्वच्छता केली. माथेरान सनसेट पॉईंट परिसरात पर्यटकांकडून टाकण्यात आलेला कचरा यामध्ये पाण्याच्या बाटल्या, खाऊचे रैपर अन्य प्रकारचा कचरा पनवेल येथील लक्ष शूटिंग क्लब संस्थेच्या वतीने गोळा करण्यात आला. या वेळी लक्ष शूटिंग क्लब पनवेल संस्था शिक्षक सिद्धार्थ शिशूर म्हणाले की, माथेरान जागतिक दर्जाचे पर्यटनस्थळ असून येथील पर्यावरणाचा ऱ्हास होऊ नये या उद्देशाने ही मोहीम राबविण्यात आली आहे.



# कोलकाता अत्याचाराचा निषेध

**नवी मुंबई : प्रतिनिधी**

कोलकाता येथे आर.जी. कर वैद्यकिय महाविद्यालयामध्ये रहिवाशी महिला डॉक्टरवर झालेल्या अत्याचाराविरोधात शनिवारी (दि. १७) डॉ. डि. वाय. पाटिल वैद्यकिय महाविद्यालयातील अधिष्ठाता, माजी अधिष्ठाता, माजी कुलगुरू, विभाग प्रमुख, पदव्युतर विद्यार्थी, पदवीधर विद्यार्थी, रूग्णालयातील परिचारिका, व प्रशासकीय अधिकारी यांनी कॉलेज व रूग्णालय बंद ठेवून निषेध व्यक्त केला.

या रॅलीकरिता संस्थेचे अध्यक्ष डॉ. विजय डी. पाटील, प्रो. चान्सलर डॉ. शिवानी पाटील यांनी पाठिंबा दिला होता. या वेळी डॉ. राजीव राव (अधिष्ठाता, स्कूल ऑफ मेडीसिन), माजी अधिष्ठाता डॉ. व्ही. आर. बधवार, माजी कुलगुरू डॉ. जेम्स थॉमस, डॉ. शिरिष पाटील, वरिष्ठ डॉ. भारती कुलकर्णी सर्व विभाग प्रमुख, पदव्युतर विद्यार्थी, पदवीधर विद्यार्थी, रूग्णालयातील परिचारिका व प्रशासकीय अधिकारी उपस्थित होते.




# देवर्षी नारद पत्रकारिता पुरस्कार प्रदान

**मुंबई : प्रतिनिधी**

विश्व संवाद केंद्र, मुंबईतर्फे दरवर्षी पत्रकारितेच्या क्षेत्रात उल्लेखनीय कार्य करणाऱ्या पत्रकारांचा 'देवर्षी नारद पत्रकारिता पुरस्कार' देऊन गौरव केला जातो. या वर्षीचा 'देवर्षी नारद पत्रकारिता पुरस्कार' सोहळा शनिवारी (दि. १७) दादर येथे उत्साहात झाला.



या सोहळ्याचे प्रमुख पाहुणे डॉ. ब्रजेश कुमार सिंह (आयपीएस) आपल्या संभाषणात म्हणाले की, इराणपासून चीनपर्यंत केवळ एकच सक्षम लोकशाही आहे ती म्हणजे भारत. सध्याच्या पत्रकारितेच्या घसरलेल्या दर्जाबद्दल त्यांनी काळजी व्यक्त केली. काही देशांच्या संसदेमध्ये सोशल मीडियावर चिंता व्यक्त केली जाते, याकडे त्यांनी लक्ष वेधले. याच विषयाला अनुसरून पुरस्कारार्थी सोशल मीडिया इन्फ्लूएंसर गौरव ठाकूर यांनी आजमितीला जे देशविघातक नॅरेटिव्ह पसरवले जात आहेत, ते आपण सगळ्यांनी एकत्र मिळून हाणून पाडले पाहिजे, असे नमूद केले. पुरस्कारार्थी ज्येष्ठ पत्रकार अजित गोगटे यांनी मनोगत व्यक्त करताना व्यावसायिक कारकिर्दीतील आपला हा पहिला पुरस्कार असल्याचे सांगितले.


माहिती देताना विश्व संवाद केंद्र, मुंबईचे मुख्य संवाद अधिकारी डॉ. निशीथ भांडारकर म्हणाले की, या सोहळ्याचे हे २३वे वर्ष आहे आणि त्याच अनुषंगाने या वर्षी पत्रकारिता आणि सोशल मीडियामधील उल्लेखनीय कामगिरीबद्दल अजित गोगटे, धीरज वाटेकर, प्रज्ञा पोवळे, अक्षय मांडवकर, सचिन गायकवाड, गौरव ठाकुर, ओंकार दाभाडकर, वनश्री राड्ये या आठ जणांचा या वेळी 'देवर्षी नारद पत्रकारिता पुरस्कार २०२४' देऊन गौरव करण्यात आला. कार्यक्रमाची सांगता सुधीर जोगळेकर यांनी आभार मानून केली.

# बीसीटी विधी महाविद्यालयात स्वातंत्र्य दिन उत्साहात साजरा

**पनवेल : रामप्रहर वृत्त**

भागूबाई चांगू ठाकूर (बीसीटी) विधी महाविद्यालयात ७८वा स्वातंत्र्यदिन उत्साहात साजरा करण्यात आला. महाविद्यालयाच्या मैदानावर झालेल्या या कार्यक्रमाचे आयोजन राष्ट्रीय दिन उत्सव समितीचे प्रभारी सहाय्यक प्राध्यापक संग्राम पवार यांनी प्रभारी प्राचार्या सानवी देशमुख यांच्या मार्गदर्शनाखाली केले.

सकाळी साडेआठ वाजता ध्वजारोहणाने उत्सवाला सुरुवात झाली. कॉलेज डेव्हलपमेंट कमिटीच्या (सीडीसी) सदस्याअर्चना परेश ठाकूर यांच्या हस्ते ध्वजारोहणाचा मान मिळाला. कार्यक्रमस्थळी सजलेल्या रंगीबेरंगी राष्ट्रध्वजांच्या पार्श्वभूमीवर ध्वजारोहण होत असताना उपस्थितांनी अत्यंत अभिमानाने व एकजुटीने राष्ट्रगीत गायले.




ध्वजारोहणानंतर प्रणिता वाघमारे यांनी स्वागत नृत्य सादर करून कार्यक्रमाची रंगत वाढवली. सहाय्यक प्राध्यापक पवार यांनी उपस्थितांचे स्वागत भाषण केले, त्यानंतर मुख्याध्यापिका सौ.देशमुख यांचे प्रेरणादायी भाषण झाले. मुख्याध्यापकांच्या भाषणात स्वातंत्र्यदिनाचे महत्त्व आणि समकालीन काळातील त्याची प्रासंगिकता यावर भर देण्यात आला. या उत्सवात देशभक्तीपर गाणी, भाषणे आणि महाविद्यालयीन विद्यार्थ्यांनी सादर केलेले स्किट असे विविध सांस्कृतिक कार्यक्रम सादर करण्यात आले. या सादरीकरणामुळे विद्यार्थी संघटनेची सामूहिक भावना आणि उत्साह यांचे प्रतिबिंब उमटत या कार्यक्रमाला चैतन्यमय स्पर्श मिळाला.

कार्यक्रमाचे सूत्रसंचालन चैत्राली काणे, अपूर्वा जाधव व प्रेरणा गायकवाड यांनी केले, तर दिशा ढोणे यांनी सर्वांचे योगदान मान्य करून आभार मानले. भागूबाई चांगू ठाकूर विधी महाविद्यालयात ७८ वा स्वातंत्र्यदिन सोहळा उत्साहात झाला, त्यात प्राध्यापक आणि विद्यार्थी दोघांनीही उत्स्फूर्त सहभाग नोंदविला. या कार्यक्रमाच्या यशाचे श्रेय शिक्षक व शिक्षकेतर कर्मचारी, सांस्कृतिक कलाकार आणि उत्साही विद्यार्थी वर्ग यांच्या एकत्रित प्रयत्नांना देता येईल, ज्यांनी हा सोहळा संस्मरणीय बनविण्यात हातभार लावला.

पान १ वरुन

## महायुती सरकारच्या योजना अविरत सुरू राहतील –आमदार प्रशांत ठाकूर

ज्येष्ठ नेते सी.सी. भगत, पनवेल शहर उपाध्यक्ष अमित ओझे, महिला मोर्चा शहर अध्यक्ष राजश्री वावेकर, युवा मोर्चाचे प्रदेश उपाध्यक्ष सुनील राणा, युवा मोर्चा उत्तर रायगड जिल्हाध्यक्ष मयुरेश नेतकर, पनवेल शहर अध्यक्ष सुमित झुंजारराव, विनायक मुंबईकर, प्रीतम म्हात्रे, केदार भगत, रूपेश नागवेकर, सुहासिणी केकाणे यांच्यासह पदाधिकारी आणि कार्यकर्ते उपस्थित होते.

या वेळी आमदार प्रशांत ठाकूर यांनी सर्वप्रथम लोकसभा निवडणुकीत चांगल्या पद्धतीचे काम केल्याबद्दल कार्यकर्त्यांचे अभिनंदन करून पुढे म्हटले की, प्रत्येक घरात पंतप्रधान नरेंद्र मोदींनी आणलेल्या योजनेचा लाभार्थी आहे. आपले सरकार योजना बंद करणारे महाविकास आघाडीचे सरकार नसून लोककल्याणकारी योजना राबवणारे महायुतीचे सरकार आहे. त्यामुळे ज्या ज्या योजना सुरू केलेल्या आहेत त्या योजना आजीवन चालू राहतील, मात्र विरोधक याचा अप्रपचार करत आहेत. ते लक्षात घेता कार्यकर्ता म्हणून आपण केंद्र आणि राज्य सरकारच्या योजना सर्वसामान्यांपर्यंत पोहचवल्या पाहिजेत. सोशल मीडियाचा प्रभावीपणे वापर करून उपयुक्त माहिती तसेच आपले म्हणणे लोकांपर्यंत पोहचवा. आपल्यावर सोपवलेल्या प्रत्येक जबाबदारीला महत्त्व आहे, ते आपण ओळखून असून समाजालाही प्रभावीपणे दिसायला पाहिजे यासाठी सर्वांनी सज्ज व्हा.

उत्तर रायगड जिल्हाध्यक्ष अविनाश कोळी यांनी या बैठकीतून आपण विधानसभा निवडणुकीची तयारी आजपासून सुरू करा, असे आवाहन कार्यकर्त्यांना केले. २०१९च्या विधानसभा निवडणुकीत आमदार प्रशांत ठाकूर यांना जे मतदान झाले होते त्यापेक्षा जास्त मतदान आगामी विधानसभा निवडणुकीत मिळवून देऊन असा निर्धार करा तसेच पनवेल विधानसभा मतदारसंघातील आपले मताधिक्य अधिकाधिक कसे वाढेल असा संकल्प करून सर्व पातळीवर भाजपचे काम पोहचवा आणि नवीन मतदार नोंदणीवर भर द्या, असेही त्यांनी सूचित केले.

प्रदेश सरचिटणीस विक्रांत पाटील यांनी राज्यात पुन्हा भाजपच्या नेतृत्वाखाली महायुतीचे सरकार येईल, असा विश्वास व्यक्त केला.

शहर अध्यक्ष अनिल भगत यांनी अध्यक्षीय भाषणात कार्यकर्त्यांनी आपली सर्व ताकद पणाला लावून केंद्र आणि राज्य सरकारची कामे तळागाळातील, सर्वसामान्य नागरिकांपर्यंत पोहचवण्याचा निश्चय करा, असे सांगितले.

या वेळी महाराष्ट्र नवनिर्माण सेनेतून अजय देवनारायण तिवारी आणि सुमन शुक्ला यांनी भाजपमध्ये जाहीर प्रवेश केला. त्यांचे आमदार प्रशांत ठाकूर आणि इतर मान्यवरांनी पक्षाची शाल देऊन स्वागत केले. त्याचप्रमाणे भाजप उत्तर भारतीय मोर्चाच्या जिल्हा उपाध्यक्षपदी सुनील उपाध्याय यांची नियुक्ती करण्यात आली असून त्यांना जिल्हाध्यक्ष संतोष शर्मा, महासचिव राजेश पांडे, उपाध्यक्ष पुष्पा तिवारी, सोशल मीडिया प्रमुख अंबिका प्रसाद तिवारी यांच्या उपस्थितीत नियुक्तीपत्र प्रदान करण्यात आले.

## महिला डॉक्टर अत्याचार, हत्येच्या निषेधार्थ खोपोलीत कँडल मार्च




या मार्चमध्ये भाजप शहर अध्यक्ष रमेश रेटरेकर, सरचिटणीस अजय इंगुलकर, युवा अध्यक्ष डॉ. निकेत पाटील, महिला मोर्चा शहर सरचिटणीस सुप्रिया नांदे, कोषाध्यक्ष विभावरी पाठक, ज्येष्ठ कार्यकर्त्या स्नेहल सावंत, सुमती महर्षी, सीमा मोगरे, भाजप शहर उपाध्यक्ष दिलीप पवार, चिटणीस सुनील नांदे, संजय म्हात्रे, विधानसभा समन्वयक हेमंत नांदे, राष्ट्रीय स्वयंसेवक संघाचे जिल्हा सहकार्यवाह अविनाश मोरे, विश्व हिंदू परिषदेचे मंत्री रूपेश मिस्त्री, डॉक्टर असोसिएशनचे सुभाष कटकदौंड, सरोजिनी कटकदौड, नलीन शहा, नरेंद्र शहा, संगीता केजरीवाल, अश्विनी ठाकूर, अनुजा यांच्यासह भाजपच्या विविध सेलचे पदाधिकारी, कार्यकर्ते मोठ्या संख्येने उपस्थित होते.

रॅलीचा बाजारपेठ, समाजमंदिर अशी काढून डॉ. बाबासाहेब आंबेडकर पुतळ्याच्या प्रांगणात समारोप करण्यात आला. या वेळी उपस्थितांनी पीडित मृत डॉक्टर तरुणीला श्रद्धांजली वाहिली. त्याचप्रमाणे तिच्यावर अत्याचार करून हत्या करणाऱ्या आरोपीस कठोर शिक्षा व्हावी, अशी जोरदार मागणी करण्यात आली.

## सौ. शकुंतला रामशेठ ठाकूर स्कूलमध्ये इन्वेस्टीचर समारंभ

समारंभाचे अध्यक्ष लोकनेते रामशेठ ठाकूर यांनी आपले विचार मांडून मार्गदर्शन केले. प्रमुख उपस्थिती असलेले गट शिक्षणाधिकारी सीताराम मोहिते यांनी संपूर्ण कार्यक्रमाचे कौतुक केले व पनवेलच्या सर्व शाळांमध्ये असे कार्यक्रम व्हावे, अशी भावना व्यक्त केली, तर स्कूलचे चेअरमन परेश ठाकूर यांनी अशा कार्यक्रमांमुळे विद्यार्थ्यांना विविध क्षेत्रात नावलौकिक मिळवण्यासाठी कशी मदत होते याबाबत मनोगत व्यक्त केले. राष्ट्रगीताने कार्यक्रमाची सांगता झाली.

## रत्नागिरीमध्ये दोन जण बुडाले

**रत्नागिरी :** आरे वारे समुद्राच्या पाण्यात पनवेल येथील शनिवारी (दि. १७) दोन जण बुडाले. यातील एकाला वाचवण्यात यश आले असून सिद्धार्थ विनायक फासे (वय १९) या तरुणाचा यात मृत्यू झाला, तर प्रविंद्र बिरादार याला वाचविण्यात स्थानिकांसह जिवरक्षकांना यश आले आहे.

वसई–विरार महापालिकेचे मुख्य लेखा परिक्षक विनायक फासे हे कुटुंबासह फिरण्यासाठी रत्नागिरीत आले होते. शनिवारी कुटुंबासमवेत आरे–वारे येथील समुद्र किनारी गेले होते. त्यांच्या मुलगा सिद्धार्थ हा पाण्यात उतरला. अशातच अचानक आलेल्या एका लाटेमुळे सिद्धार्थ पाण्यात ओढला गेले. पाण्याचा प्रवाह जास्त असल्याने सिद्धार्थ आत ओढला गेला. सिद्धार्थला वाचविताना प्रविंद्र बिरादार यांच्या श्वास गुदमरु लागल्याने ते पाण्यात कोसळले.

## निवडक

### हद्दपार आरोपी ताब्यात

**पनवेल :** एक वर्षाकरिता रायगड, ठाणे या जिल्ह्यातून हद्दपार करण्यात आलेला आरोपी अरिफ सौरभ शेख याला ताब्यात घेऊन त्याच्यावर तळोजा पोलीस ठाण्यात महाराष्ट्र पोलीस अधिनियम अंतर्गत गुन्हा दाखल करण्यात आला. अरिफ सौरभ शेख (रा. तळोजा) हा तळोजा पोलिसांना तळोजा पोलीस ठाण्याच्या परिसरात फिरताना दिसून आला. एपीएमसी पोलीस ठाणे यांच्या रेकॉर्डवरील हा आरोपी असून दोन महिन्यांपासून ठाणे, रायगड जिल्ह्यातून एक वर्षापासून हद्दपार केले असल्याचे त्याने सांगितले. त्यावेळी त्याच्यावर गुन्हा दाखल करण्यात आला.

### हरेश्वर ठाकूर सन्मानित

**उरण :** स्वातंत्र्य दिनी जिल्हाधिकारी तथा जिल्हा दंडाधिकारी कार्यालय जिल्हा आपत्ती व्यवस्थापन प्राधिकरण रायगड अलिबाग यांच्याकडून रायगड जिल्हा पोलीस ग्राउंड अलिबाग येथे आपदा मित्र, नागरी संरक्षण दलमधील पदाधिकारी कर्मचारी व विविध स्वयंसेवकांना त्यांच्या विशेष कार्याबद्दल 'विशेष सन्मानपत्र' देऊन गौरविण्यात आले. या वेळी आपत्ती व्यवस्थापन क्षेत्रात नेहमी अग्रेसर राहणारे उरण मधील सामाजिक कार्यकर्ते हरेश्वर ठाकूर यांचाही सन्मान करण्यात आला आहे. महिला व बालकल्याण मंत्री आदिती तटकरे यांच्या हस्ते हरेश्वर ठाकूर यांना आपदा विशेष सन्मान पत्र देऊन गौरविण्यात आले.

### कपाटातून ७० हजार चोरले

**पनवेल :** घराच्या दरवाजातून आत प्रवेश करून कपाटात ठेवलेले ७० हजार रुपयांची चोरी केल्याप्रकरणी तळोजा पोलीस ठाण्यात गुन्हा दाखल करण्यात आला. रुकसाना रमी खान या तळोजा येथे राहत असून त्यांच्या घराचा दरवाजा अर्धवट ढकलेला होता. त्यानंतर त्यांची मुलगी पहाटेपर्यंत अभ्यास केल्यावर ती झोपी गेली. त्यानंतर सकाळी उठले असता त्यांना घराचा कपाट व घराचा दरवाजा उघडा दिसला. या वेळी ७० हजार रुपये चोरून नेण्यात आले.

### अतिक्रमित जागांवर कारवाई

**पनवेल :** आयुक्त मंगेश चितळे यांच्या निर्देशानुसार प्रभाग समिती अ खारघर सेक्टर क्रमांक १४ मधील अनधिकृत झोपड्यांवर प्रभाग समिती अ च्या अतिक्रमण विभागाच्यावतीने तोडक कारवाई करण्यात आली. तसेच खारघरमधील एका हॉटेल बाहेर अनधिकृतरित्या आक्रमण केलेल्या जागांवर तोडक कारवाई करण्यात आली. उपायुक्त बाबासाहेब राजळे यांच्या मार्गदर्शनाखाली प्रभाग अधिकारी जितेंद्र मढवी यांच्या उपस्थितीमध्ये ही कारवाई करण्यात आली. अनधिकृतरित्या आक्रमण केलेल्या जागांवर खारघर प्रभाग समिती अ च्या अतिक्रमण पथकाने जेसीबीच्या साहाय्याने तोडक कारवाई केली.



**पनवेल : संजय बाबुराव धारेराव यांची पोलीस उपनिरीक्षकपदी पदोन्नती झाली. त्याबद्दल करंजाडे ग्रामस्थांच्या वतीने सरपंच मंगेश शेलार यांच्या पंच कमिटीने ग्रामपंचायत कार्यालय येथे धारेराव यांचा सत्कार केला.**

# आदई गावात काँक्रीटीकरणाचे भूमिपूजन

## आमदार प्रशांत ठाकूर यांच्या निधीतून विकासाचे काम

**पनवेल : रामप्रहर वृत्त**

आदई गावात आमदार प्रशांत ठाकूर यांच्या आमदार निधीमधून करण्यात येणाऱ्या रस्त्याच्या काँक्रिटीकरणाच्या कामाचे भूमिपूजन भाजपचे पनवेल तालुका अध्यक्ष अरुणशेठ भगत यांच्या हस्ते शनिवारी (दि. १७) झाले.



आमदार प्रशांत ठाकूर यांच्या माध्यमातून पनवेल विधानसभा मतदार संघातातील नागरीकांना विविध सुविधा उपलब्ध करुन देण्यासाठी कटीबद्ध असून त्यांच्या सातत्यापुर्ण पाठपुराव्यामुळे अनेक विकासाची कामे मार्गी लागत आहेत. त्यानुसार आमदार प्रशांत ठाकूर यांच्या २० लाख रुपयांच्या आमदार निधीमधून आदई गावातील साई मंदिर ते काटकर वाडीपर्यंतच्या रस्त्याचे काँक्रिटीकरण करण्यात येणार आहे. या कामाचे भूमिपूजन भारतीय जनता पक्षाचे पनवेल तालुका अध्यक्ष अरुणशेठ भगत यांच्या हस्ते शनिवारी झाले.

या वेळी भाजपचे पनवेल तालुका सरचिटणीस भुपेंद्र पाटील, आदईचे माजी सरपंच महादू धर्मा शेलके, धर्मा सीताराम काकडे, बालाराम रामदास पाटील, भाई रामा पाटील, राम अंबो शेलके, जगदीश भगवान शेलके, मंगेश भोपी, युवा मोर्चाचे आदई पंचायत समिती विभागीय अध्यक्ष निलेश पाटील, जनार्दन पाटील, उद्धव पाटील, राजेश काकडे, पद्माकर शेलके, कैलास पाटील, सत्यवान खांडे, किशोर म्हात्रे, श्रीचंद भंडारी, निलेश पाटील, न्यानेश्वर पाटील, रोहित पाटील, विवेक वसंत पाटील, सूरज पाटील, किरण आशोक शेलके, तेजस म्हात्रे, सूरज म्हात्रे, प्रवीण पाटील, आशीष पाटील, एकनाथ शेलके, अनंत मोकल, गोकुलदास भंडारी, सचिन भोईर, सूरज भोईर, सुजीत राम शेलके, शिशिर शेलके, रामदास पाटील, रघुनाथ शेलके, हरी शेलके, नितिन शेलके, अनिकेत पाटील, गुरुनाथ मोकल, जीवन घरत, प्रकाश खोलपते, सचिन शिंदे, रोहित झगडे, अनुराग पांडे, आश्विन पेलवान यांच्यासह पदाधिकारी, कार्यकर्ते आणि ग्रामस्थ उपस्थित होते.

# पाईपलाईन फुटल्याने नुकसान झालेल्या कुटुंबियांना आर्थिक मदत

## आमदार प्रशांत ठाकूर, परेश ठाकूर यांचे आभार

**पनवेल : रामप्रहर वृत्त**

पनवेल महापालिकेची पाणीपुरवठा करणारी पाईपलाईन फुटल्याने नुकसान झालेल्या कुटुंबियांना आमदार प्रशांत ठाकूर आणि माजी सभागृह नेते परेश ठाकूर यांच्या माध्यमातून तात्पुरत्या स्वरूपात पाच हजार रुपयांची आर्थिक मदत करण्यात आली आहे. यासाठी भाजपचे उत्तर रायगड जिल्हा सरचिटणीस ॲड. प्रकाश बिनेदार यांनी पाठपुरावा केला होता.



पनवेलमधील शिवाजीनगर वसाहतीमध्ये शुक्रवारी पहाटेच्या सुमारास महापालिकेची पाणीपुरवठा करणारी पाईपलाईन फुटल्याने वसाहतीमध्ये पाणी घुसले. यामुळे अनेक घरांचे नुकसान झाले. ही बाब स्थानिक कार्यकर्त्यांनी माजी नगरसेवक ॲड. प्रकाश बिनेदार यांना कळवताच त्यांनी भारतीय जनता पक्षाच्या माध्यमातून आमदार प्रशांत ठाकूर आणि पनवेल महापालिकेचे माजी सभागृह नेते परेश ठाकूर यांच्याकडून प्राथमिक स्वरूपाची प्रत्येकी पाच हजार रुपये मदत तत्काळ मिळवून दिली. ही मदत सागर सोनकर, शिवाजी भांडवलकर, हरीश बेंडकडे, सुष्मिता गुप्ता, अनिल पंडित आदींसह झोपडपट्टी धारकांना देण्यात आली.

या मदतीचे वितरण माजी नगरसेवक ॲड. प्रकाश बिनेदार, ॲड. मनोज भुजबळ, माजी नगरसेविका ॲडव्होकेट वृषाली वाघमारे, सुशीला घरत, जगदीश घरत, परेश घरत, राहुल वाहूळकर, कबीर बागवान यांच्या हस्ते करण्यात आले. या वेळी अनिल साळवी, निसार बागवान, आनंद पवार, विष्णू धोत्रे उपस्थित होते. दरम्यान, पाणी शरिल्यामुळे वसाहतीमधील नागरीकांसमोर जेवण बनवायची समस्या उद्भवली होती. त्यामुळे त्यांच्या जेवणाची सोय ॲड. मनोज भुजबळ यांनी केली होती.



**पनवेल : भाजप उलवे नोड १च्या सरचिटणीसपदी अंकुश ठाकूर यांनी नियुक्ती करण्यात आली आहे. त्याबद्दल त्यांनी माजी खासदार लोकनेते रामशेठ ठाकूर यांची भेट घेऊन आशीर्वाद घेतले. लोकनेते रामशेठ ठाकूर यांनी अंकुश ठाकूर यांचे अभिनंदन करून पुढील वाटचालीसाठी शुभेच्छा दिल्या. या वेळी भाजपचे उलवे नोड २चे अध्यक्ष विजय घरत, हेमंत ठाकूर, तालुका चिटणीस जयवंत देशमुख, सुहास भगत, सुधीर ठाकूर, किशोर पाटील आदी उपस्थित होते.**

# जासई गावात आढळला मृतदेह

**उरण :** तालुक्यातील जासई गावामध्ये थरारक घटना घडली आहे. गावातील दि. बा. पाटील सभागृहाजवळ असणाऱ्या निर्जन जागी एका अज्ञात पुरुषाचा मृतदेह प्लास्टिकच्या गोणीत आढळून आला आहे. याप्रकरणी पोलीस अधिक तपास करीत आहेत.

शनिवारी (दि. १७) सकाळी ८च्या सुमारास गावातील नागरिकांना जासई गावातील दि. बा. पाटील सभागृहाजवळ एक प्लास्टिकची गोणी आढळून आली. या गोणीतुन दुर्गंध येत होती, नक्की या गोणीत काय आहे? ही पाहणी केली असता, त्यात अज्ञात मृतदेह आढळून आला. यासंदर्भात ग्रामस्थांनी पोलिसांना माहिती दिली काही वेळात पोलीस घटनास्थळी दाखल झाले.तब्बल साडेतीन तासानंतर पोलिसांच्या माध्यमातून ही गोण खोलण्यात आली. संबंधित व्यक्तीची ओळख अजूनही पटलेली नाही अज्ञात मृतदेहाचा उरण पोलीस शोध घेत आहेत.

# एमपीएएससी महाविद्यालयाचे गांधी विचार संस्कार परीक्षेत यश



**पनवेल : रामप्रहर वृत्त**

रयत शिक्षण संस्थेचे पनवेल येथील महात्मा फुले कला, विज्ञान व वाणिज्य (एमपीएएससी) महाविद्यालयातील विद्यार्थ्यांनी गांधी रिसर्च फाउंडेशन तर्फे घेण्यात आलेल्या गांधी विचार संस्कार परीक्षा २०२३-२४मध्ये यश संपादन केले.

इयत्ता अकरावीमध्ये जगताप श्रुती प्रभू (जिल्ह्यात सुवर्णपदक), पाटील जान्हवी मधुकर (रौप्यपदक), मोकल नेत्रम अनिल (कांस्यपदक) तसेच इयत्ता बारावीमध्ये मुखर्जी मनाली प्रद्योत (सुवर्णपदक), पाटील सोहम सुरेश (रौप्यपदक), यादव आरुषी स्वामिनाथन (रौप्यपदक) यांनी गांधी विचार संस्कार परीक्षेत यश संपादन केले.

गांधी विचार संस्कार कमिटीच्या चेअरमन आर.ए. नावडकर, सदस्य एम.एस. वाघे, एच.सी. कनोजा व ए.एस. मदने यांनी विद्यार्थ्यांना वेळोवेळी मार्गदर्शन केले. सर्व विद्यार्थ्यांचे महाविद्यालयाचे प्राचार्य डॉ.गणेश ठाकूर, उपप्राचार्य डॉ. आर.ए. पाटील, डॉ.एन.बी. पवार, ज्युनिअर विभाग सायन्स इन्चार्ज एस.आर. काटकर व आर्ट्स कॉमर्स इन्चार्ज डॉ. व्ही. एस.विशे यांनी अभिनंदन केले.

# अटल सेतूवरून समुद्रात देवाचे फोटो टाकणारी महिला बचावली

**उरण : प्रतिनिधी, बातमीदार**

न्हावा-शिवडी सेतूवर शुक्रवारी मुंबईकडून शेलघर टोलनाक्याकडे जाणाऱ्या लेन १२.४ अंतरावर स्विफ्ट डिझायर कार (एमएच ०२ ए फएच १६८६) ही रस्त्यात थांबली असून कार मधील एक महिला ब्रिजच्या रेलिंग क्रॉस करून काहीतरी करीत आहे, अशी माहिती न्हावाशेवा वाहतूक शाखा पेट्रोलिंगच्या पोलीस अधिकारी व कर्मचाऱ्यांना मिळताच पोलिसांनी तिला वाचवले. ती महिला अटल सेतूवरून समुद्रात देवाचे फोटो टाकणासाठी आलेली असल्याचे समजले.






महिला रीमा मुकेश पटेल (वय ५६, गृहिणी राहणार मुलुंड मुंबई) यांनी ब्रिजवरून उडी घेण्याचा प्रयत्न केला असता पेट्रोलिंग वर कार्यरत असलेले पोलीस अंमलदारांनी स्वतःचा जीव धोक्यात घालून कसोशीने प्रयत्न करीत तिला सुरक्षित वर काढून तिचा जीव वाचविला. सर्वप्रथम एका कार ड्रायवरने तिला आत्महत्तेपासून रोखण्याचा प्रयत्न केला. तरीही ती महिला ऐकत नव्हते, मात्र वेळेत वाहतूक शाखेचे पोलीस कर्मचारी दाखल झाल्याने महिलेला पोलिसांनी पुलावरून बाहेर ओढून तिचे प्राण वाचवले.

चालक संजय द्वारका यादव (वय३१) वर्षे धंदा टॅक्सी चालक राहणार कोपरी, हेमलता यांची चाळ ठाणे या व्यक्तीने सर्वप्रथम त्या महिलेला समुद्रात उडी मारू नये म्हणून पकडून ठेवले. त्यानंतर घटना स्थळी पोलीस दाखल झाले व महिलेचा जीव वाचविण्याची चोख कामगिरी केली.

महिला अगोदर ऐरोली येथे समुद्रात देवाचे फोटो टाकण्यासाठी गेली होती, मात्र तिथे पाणी कमी होते. तिला कोणीतरी सांगितले होते की देवाचे फोटो खोल पाण्यात विसर्जन करावे. त्या अनुषंगाने ती खोल पाण्याचा शोध घेत अटल सेतू वर आली. ती महिला धार्मिक वृत्तीची असून ती गोंधळलेल्या स्थितीत होती. अशी प्राथमिक माहिती मिळाली आहे. महिलेला वाचविण्यात यश आले असून ती महिला फोटो टाकण्यासाठी आली होती, की आत्महत्त्या करण्यासाठी आली होती. याचा अधिक तपास न्हावाशेवा पोलीस करीत आहेत, असे न्हावाशेवा पोलीस ठाण्याचे वरिष्ठ निरीक्षक अंजुमन बागवान यांनी सांगितले.

# वीसीटी विधी महाविद्यालयात यशस्वी पुस्तक समीक्षा स्पर्धा

**पनवेल : रामप्रहर वृत्त**

राष्ट्रीय ग्रंथपाल दिनानिमित्त सोमवारी (दि. १२) नवीन पनवेल येथील भागूबाई चांगू ठाकूर (बीसीटी) कॉलेज ऑफ लॉच्या सेमिनार हॉलमध्ये पुस्तक समीक्षा स्पर्धेचे आयोजन करण्यात आले होते.



वाचनालय समिती प्रभारी तथा ग्रंथपाल जान्हवी भोईर यांनी प्रभारी मुख्याध्यापिका सानवी देशमुख यांच्या मार्गदर्शनाखाली आयोजित केलेल्या या कार्यक्रमात वाचनाची आवड निर्माण व्हावी आणि विद्यार्थ्यांची विश्लेषणक्षमता वाढावी, हा या कार्यक्रमाचा उद्देश होता. या स्पर्धेत विविध कार्यक्रम आणि शैक्षणिक वर्षांतील २० विद्यार्थ्यांनी सहभाग नोंदविला, ज्यांनी कथा, नॉन-फिक्शन आणि चरित्रांसह विविध शैलींमध्ये अभ्यासपूर्ण समीक्षा सादर केली. नवीन पनवेल येथील चांगू काना ठाकूर कला, वाणिज्य व विज्ञान महाविद्यालय (स्वायत्त) चे ग्रंथपाल डॉ. रमाकांत नवघरे यांनी आढावा घेतला.

डॉ. नवघरे यांनी सादरीकरणाच्या उच्च क्षमतेचे कौतुक करत मौलिकता, विश्लेषणाची खोली, लेखनशैली आणि विषयविषयक प्रासंगिकता या विषयांवरील सादरीकरणांचे मूल्यमापन केले. संस्थेत रुजलेल्या चैतन्यमय वाङ्मयसंस्कृतीची साक्ष देणारा हा कार्यक्रम होता. स्पर्धेमुळे त्यांच्या वाचनाच्या सवयी आणि विश्लेषणात्मक कौशल्यात लक्षणीय सुधारणा झाल्याचे सहभागींनी नमूद केले. विद्यार्थी, प्राध्यापक आणि कर्मचाऱ्यांच्या उत्स्फूर्त पाठिंब्यामुळे कार्यक्रमाचे चैतन्यमय वातावरण आणखी वाढले. कार्यक्रमाचे सूत्रसंचालन अपूर्वा जाधव, चैत्राली काणे व मृणाल पाटेकर यांनी केले.

जान्हवी भोईर यांनी प्रास्ताविकात राष्ट्रीय ग्रंथपाल दिनाचे महत्त्व आणि ग्रंथालय शास्त्राचे जनक एस. आर. रंगनाथन यांच्या योगदानावर भर दिला. प्रमुख पाहुणे डॉ. रमाकांत नवघरे यांनी प्रास्ताविक केले.

स्पर्धेत हिमांशू मिश्रा (दुसरे वर्ष एलएलबी) यांनी प्रथम क्रमांक पटकावला, तर सुप्रिया मिश्रा (५वे वर्ष बीएएलएलबी) आणि भुवनेश्वरी नायडू (दुसरे वर्ष बीएएलएलबी) यांनी द्वितीय क्रमांक पटकावला. कृतेश्वर सिंग (एलएलबी द्वितीय वर्ष) याने तृतीय क्रमांक पटकावला. एकंदरीत, पुस्तक समीक्षा स्पर्धेच्या यशामुळे महाविद्यालयीन समुदायात वाचन आणि शिक्षणाला चालना देण्याच्या उद्देशाने भविष्यातील उपक्रमांसाठी सकारात्मक उदाहरण निर्माण झाले आहे.

# नवीन पनवेल येथे स्वातंत्र्य दिन

**पनवेल : रामप्रहर वृत्त**


बुद्धगया प्रतिष्ठान अंतर्गत आम्रपाली बुद्धविहार या संस्थेच्यावतीने बिनेदार कॉर्नर व आम्रपाली बुद्धविहार, नवीन पनवेल. या ठिकाणी भारताचा ७८वा स्वांतत्र्य दिन मोठ्या उत्साहात साजरा करण्यात आला आणि स्वातंत्र्य दिनाचे औचित्य साधून नागरिकांना छत्री वाटपाचा कार्यक्रमही आयोजित करण्यात आला होता.




या कार्यक्रमात बिनेदार कॉर्नर येथील झेंडावंदन ज्येष्ठ पत्रकार श्याम साळवी आणि आम्रपाली बुद्ध विहार येथील झेंडावंदन राष्ट्रपती शौर्यपदक विजेते सुभाष कांबळे यांच्या हस्ते करण्यात आले. राष्ट्रगीतानंतर उपस्थित मान्यवरांची मार्गदर्शक भाषणे होऊन छत्री वाटप माजी नगरसेवक ॲड. प्रकाश बिनेदार, भाजप वरिष्ठ नेते जगदीश घरत, व्यावसायिक राजेश घोडके, बिल्डर श्रीपाद शेठ भंडारी, विनोद जोशी सर आदि उपस्थित मान्यवरांच्या हस्ते करण्यात आले.

या कार्यक्रमाचे आयोजन बुद्धगया प्रतिष्ठान अंतर्गत आम्रपाली बुद्ध विहाराचे संस्थापक-अध्यक्ष माजी नगरसेवक ॲड. प्रकाश बिनेदार यांनी केले होते. हा कार्यक्रम यशस्वी करण्यासाठी त्यांच्या कार्यकर्त्यांनी भरपूर मेहनत घेतली.

# सलिम जावेद 'दुसरी बाजू' खरंच काही सांगते?








विजय आनंदचे दिग्दर्शन असे म्हणताक्षणीच गाईड, ज्वेल थीफ, तिसरी मंझिल, जॉनी मेरा नाम असे अनेक चित्रपट एव्हाना डोळ्यासमोर आले असतील तर त्यात आश्चर्य ते काय? याच विजय आनंदने देव आनंद, शशी कपूर, धर्मेंद्र, हेमा मालिनी, राखी, ऋषी कपूर, टीना मुनिम, परवीन बाबी, अमजद खान अशी जबरदस्त स्टार कास्ट घेऊन एक दो तीन चार या चित्रपटाचा जोरदार शोरदार मुहूर्त केला. १९७८ सालची ही गोष्ट. या चित्रपटाची पटकथा व संवाद लेखन सलिम जावेद यांचे होते. याच्या पटकथेवर विजय आनंदचे दिग्दर्शन हा एक जबरदस्त योग आला...

बरेच दिवस या मुहूर्ताच्या बातम्या प्रसिद्ध होत राहिल्या. तेवढीच त्या चित्रपटाची प्रगती.

सलिम खान व जावेद अख्तर या यशस्वी पटकथा व संवाद लेखक जोडीच्या लघुपटाच्या निमित्ताने पटकन आठवले ते एक दो तीन चार या भव्य दिव्य चित्रपटाचा दिमाखदार मुहूर्त.

सलिम जावेद यांच्या यशस्वी वाटचालीत दुसरी बाजूदेखील आहे...

सत्तरच्याच दशकातील असाच एक सॉलिड गाजलेला वाद.

एका गॉसिप्स मॅगझिनला दिलेल्या एका मुलाखतीत सलिम जावेद यांनी म्हटलं, आम्ही पटकथाच अशी बारीकसारीक तपशीलवार देतो की, दिग्दर्शकाला काम ते काय राहते? आम्ही आमच्या पटकथेतील प्रत्येक व्यक्तीरेखीची तपशीलवार वैशिष्ट्य देतो, प्रत्येक प्रसंग कसा असेल हेही लिहितो वगैरे वगैरे. गॉसिप्स मॅगझिनमधली मुलाखत म्हणजे असेच काही असणार यात आश्चर्य नव्हतेच. मनमोहन देसाई व प्रकाश मेहरा यांना हे अजिबात रूचले नाही. तसे ते स्पष्टवक्तेपणासाठी ख्यातनाम. त्यात पुन्हा मनमोहन देसाई यांनी सलिम जावेद यांच्या पटकथेवर फक्त चाचा भतिजा हा एकमेव, तर प्रकाश मेहरा यांनी जंजीर व हाथ की सफाई हे दोनच चित्रपट दिग्दर्शित केले. त्या काळातील आघाडीच्या या दोन दिग्दर्शकांनी सलिम जावेदपेक्षा अन्य पटकथा लेखकांना महत्त्व दिले. त्यांनी सलिम जावेदना सडेतोड उत्तर देताना म्हटले, त्यांच्या पटकथेवर दिग्दर्शकाला फारसे काम नसते तर ए. सलाम दिग्दर्शित आखरी डाव आणि देश मुखर्जी दिग्दर्शित इमान धरम का पूर्णपणे अपयशी ठरले...

हे उत्तर मला आवडले, कारण मी मनमोहन देसाई व प्रकाश मेहरा यांचा चाहता. १९९१ साली एका दिवाळी अंकासाठी मनजींची आमच्या गिरगावातील खेतवाडीतील प्रताप निवासमधील घरी अमिताभ बच्चन या विषयावर मी मुलाखत घेतली तेव्हा या वादावर आमचे बोलणे झाले.

**झूम प्रहर**



**दिलीप ठाकूर**
चित्रपट समीक्षक

अमिताभच्या साठीनिमित्त जुहूच्या सुमित प्रिव्ह्यू थिएटरमधील कार्यालयात प्रकाश मेहरांची मुलाखत घेतली तेव्हाही या गाजलेल्या वादाची मी त्यांना आठवण करून दिली.

सलिम जावेद यांच्या दुसऱ्या बाजूच्या गोष्टीही भारीच.

अपयश ही जगातील सर्वात अप्रिय गोष्ट. कोणालाही नको असलेली. सलिम जावेदनाही अर्थात नकोशी असलेली, पण त्यांच्या प्रगती पुस्तकात ती आहे.


सिनेमाच्या जगात तर 'अपयश' हा शब्द प्रचलित नसता तर बरे झाले असते अशी जणू सार्वत्रिक भावना कायमच असते. यश हेच येथील सर्वात मोठे टॉनिक. सर्वात मोठे चलनी नाणे.

पण अपयश कोणाला चुकलयं? येथे शंभर टक्के यशाचे असे प्रगती पुस्तक कोणाचेही नाही. ते शक्यच नाही, कारण अनेक बाबतीत पब्लिक पसंतीचा थेट संबंध असतो. निर्माता, दिग्दर्शक, कलाकार, गीतकार, संगीतकार, गायक यापासून अगदी चित्रपट वितरक, प्रदर्शक असे त्याला कोणीही अपवाद नाही. तोही एक चित्रपटसृष्टीतील खेळाचा एक रंजक व उत्सुकतापूर्ण भाग आहे. फ्लॉप चित्रपटाबाबत तसेच आहे. त्याच्या गोष्टी आणखी भारी.

पटकथा आणि संवाद लेखक सलिम जावेद यांच्या एका चित्रपटाबाबत अगदी असेच घडलयं.

त्यांनी 'सौदा नावाचा एक चित्रपट लिहिला होता, अशी फारशी कुठे नोंद नाही. आजच्या ग्लोबल युगातील डिजिटल पिढीला उठसूठ माहितीसाठी गुगलचा मोठाच आधार वाटतो, त्यातही सलिम जावेद यांच्या यशस्वी कर्तृत्वाच्या चित्रपट यादीत सौदा या १९७४च्या चित्रपटाचे नावच नाही, पण या चित्रपटाच्या अतिशय दुर्मिळ अशा पोस्टरवर मात्र कथा सलिम जावेद असे म्हटले आहे. या चित्रपटाचे निर्माते होते सी.एस. ओबेरॉय आणि दिग्दर्शक आहेत, सुदेश इस्सार. या चित्रपटात विनोद खन्ना, योगिता बाली, मदन पुरी, सुधीर, मुक्री, जानकीदास, पूर्णिमा आणि रणजित यांच्या प्रमुख भूमिका आहेत. इतर छोट्या छोट्या भूमिकेत रशिद खान, सी.एस. दुबे, श्याम अरोरा, लीना डिसोझा, उमा दत्त यांच्याही भूमिका आहेत, तर इंद्रजीतसिंग तुलसी यांच्या गीताना लक्ष्मीकांत प्यारेलाल यांचे संगीत आहे. हा चित्रपट नेमका कधी आणि कुठे प्रदर्शित झाला हे फार फार तर विनोद खन्नाचे जबरा फॅन सांगतील. असतात हो असे पंखे. त्या काळात खलनायकीकडून हीरोगिरीकडे वळताना विनोद खन्नाने लगाम, धमकी, मेम साब, खंजर असे बरेच छोटे छोटे चित्रपट स्वीकारत स्वतःला बिझी ठेवत ठेवत 'आपण आता हीरो आहोत' हे अधोरेखित ठेवले होते. प्रत्येक क्षेत्राचे काही अलिखित नियम असतात तसेच हे आहेत. येथील खेळी काही वेगळीच असते आणि त्यात गंमत आहे.




पण हा चित्रपट सलिम जावेद यांनी लिहिला आहे हे दुर्लक्षित का राहिले अथवा मागे का पडले असावे? सलिम जावेद यांनी एकीकडे जंजीर, हाथ की सफाई, यादों की बारात, शोले, त्रिशूल, शान, क्रांती, डॉन, दोस्ताना, शक्ती असे अनेक सुपर हिट चित्रपट लिहिले आणि पटकथा व संवाद लेखकांना ग्लॅमर आणले, त्यांचे मूल्य वाढवले, त्यांना पोस्टरवर स्थान मिळवून दिले, तरीही त्यांच्या खात्यात काही फ्लॉप्स चित्रपटही आहेत. एस.एम. सागर दिग्दर्शित 'अधिकार' (१९७१. प्रमुख भूमिका अशोककुमार, नंदा, देब मुखर्जी, नाझिमा आणि प्राण), ए. सलाम दिग्दर्शित 'आखरी डाव' (१९७५. जितेंद्र, सायरा बानू आणि डॅनी), प्रेमजी निर्मित आणि देश मुखर्जी दिग्दर्शित 'इमान धरम' (१९७७. शशी कपूर, संजीवकुमार, अमिताभ बच्चन, रेखा, अमरीश पुरी, डॉ. श्रीराम लागू, प्रेम चोप्रा आणि हेलन), रमेश तलवार दिग्दर्शित 'जमाना' (१९८५. राजेश खन्ना, ऋषि कपूर, पूनम धिल्ला आणि रंजिता) या चित्रपटांना रसिकांनी नाकारले. 'इमान धरम'च्या अपयशाच्या वेळी तर सलिम जावेद यांची पटकथा आणि संवाद म्हणजे हमखास यशच अशा इमेजला जबर धक्का बसला होता. गॉसिप्स मॅगझिनमधून बरेच काही ना काही लिहून आले.

राजेश खन्नाची दुहेरी भूमिका असलेल्या चक्क दोन चित्रपटांची पटकथा व संवाद सलिम जावेद यांचे होते, पण राजेश खन्नाने त्यात बरेच फेरफार केल्याने सलिम जावेद यांनी आपले नाव मागे घेतल्याचे त्या काळात गॉसिप्स मॅगझिनमधून फार गाजले. मस्तकलंदर या चित्रपटाच्या निमित्ताने सलिम खान यांची दीर्घ मुलाखत घेतली तेव्हा त्यांनीही त्याबाबत मला सांगितले. ते चित्रपट होते, जम्बू दिग्दर्शित 'मेरे जीवन साथी' (१९७४, यात नायिका होत्या तनुजा आणि मौशमी चटर्जी) आणि सतपाल दिग्दर्शित 'भोला भाला' (१९७९. यात नायिका होत्या रेखा आणि मौशमी चटर्जी) या दोन्ही चित्रपटांची राहुल देव बर्मनचे संगीत असलेली गाणी लोकप्रिय झाली, पण दोन्ही चित्रपट फ्लॉप ठरल्याने सलिम जावेद यांच्या खात्यात हे अपयश जमा झाले नाही. अन्यथा त्यांचे अपयशाचे पारडे थोडे जड झाले असते. तसे होऊ नये म्हणून 'सौदा'ची आठवणही नको असावी.

ते काही असो सलिम जावेद लघुपटाचे स्वागत आहे. पटकथा कशी असावी/लिहावी (निर्माता व दिग्दर्शकांकडे त्याचे महत्व कसे पटवून द्यावे), स्वतःचे मार्केटिंग कसे करावे यासाठी सलिम जावेद आयडॉल आहेत. तरी आता पुन्हा जरी ते एकत्र आले तरी आजच्या ग्लोबल युगातील डिजिटल वातावरणात त्यांच्या पटकथेवर चित्रपट निर्माण करावा असे कोणत्या दिग्दर्शकाला मनोमन वाटेल हा प्रश्नच आहे? फरहान अख्तरला वाटेल का? त्याचा सलिम जावेद लिखित, मनोजकुमार दिग्दर्शित क्रांती चित्रपट जास्त आवडता आहे. खुद्द सलिम जावेद आपल्याचा एखाद्या चित्रपटाची रिमेक लिहिण्यात रस घेतील का? जावेद अख्तर यांनी 'दीवार'वरूनच राहुल रवैल दिग्दर्शित जीवन एक संघर्ष लिहिला, सलिम खान यांनी 'दीवार'वरूनच शशिलाल नायर दिग्दर्शित फलक लिहिला.

सलिम जावेद यशस्वी व आदर्श पटकथा व संवाद लेखक निश्चित आहेत (की होते?) पण त्यांच्या कारकीर्दीची दुसरी बाजू (की पडती बाजूदेखील) पाह्यला हवी ना?

## नेताजी सुभाषचंद्र बोस



नेताजी म्हणून प्रसिद्ध असलेले सुभाषचंद्र बोस हे एक महान लढाऊ, स्वातंत्र्यसैनिक आणि देशभक्त होते. जेव्हा आपण सुभाषचंद्र बोस हे नाव ऐकतो तेव्हा आपल्या मनात पहिली गोष्ट येते ती म्हणजे तुम मुझे खून दो में तुम्हे आझादी दूंगा ही त्यांची लोकप्रिय म्हण. आज त्यांचा स्मृतिदिन, त्यानिमित्ताने त्यांच्या कार्याचा घेतलेला आढावा...

स्वातंत्र्य चळवळीचे महान नेते सुभाषचंद्र बोस यांचा जन्म २३ जानेवारी १८९७ रोजी ओडिसातील कटक येथील प्रसिद्ध वकील जानकी नाथ आणि प्रभावती देवी यांच्या पोटी झाला. इंग्रजांच्या दडपशाहीच्या निषेधार्थ त्यांच्या वडिलांनी 'रायबहादूर' ही पदवी परत केली. त्यामुळे सुभाषच्या मनात इंग्रजांबद्दल कटुता रुजली. आता सुभाष यांनी इंग्रजांना भारतातून हुसकावून लावण्याची आणि भारताला स्वतंत्र करण्याची प्रतिज्ञा घेतली आणि राष्ट्रवादाच्या मार्गावर चालू लागले. आयसीएस परीक्षा उत्तीर्ण झाल्यानंतर सुभाष यांनी आयसीएसचा राजीनामा दिला. या गोष्टीवर त्यांच्या वडिलांनी त्यांचे मनोबल वाढवले आणि सांगितले 'तुम्ही देशसेवेचे व्रत घेतले आहे, तेव्हा या मार्गापासून कधीही विचलित होऊ नका.'

डिसेंबर १९२७मध्ये काँग्रेस पक्षाचे राष्ट्रीय सरचिटणीस बनल्यानंतर १९३८मध्ये त्यांची काँग्रेसचे राष्ट्रीय अध्यक्ष म्हणून निवड झाली. ते म्हणाले होते, महात्मा गांधींच्या नेतृत्वाखाली आपण स्वातंत्र्यासाठी लढले पाहिजे ही माझी इच्छा आहे. आमचा लढा केवळ ब्रिटीश साम्राज्यवादाविरुद्ध नाही, तर जागतिक साम्राज्यवादाविरुद्ध आहे, मात्र हळुहळू सुभाष यांचा काँग्रेसशी भ्रमनिरास होऊ लागला.

१६ मार्च १९३९ रोजी सुभाष यांनी आपल्या पदाचा राजीनामा दिला. स्वातंत्र्य चळवळीला नवा मार्ग देत सुभाष यांनी तरुणांना संघटित करण्याचा प्रयत्न पूर्ण निष्ठेने सुरू केला. त्याची सुरुवात ४ जुलै १९४३ रोजी सिंगापूर येथे झालेल्या 'भारतीय स्वातंत्र्य परिषदे'ने झाली.

५ जुलै १९४३ रोजी 'आझाद हिंद फौज'ची औपचारिक स्थापना झाली. २१ ऑक्टोबर १९४३ रोजी नेताजींनी आशियातील विविध देशांमध्ये राहणाऱ्या भारतीयांची परिषद भरवून आणि तात्पुरते स्वतंत्र भारत सरकार स्थापन करून स्वातंत्र्य मिळवण्याचा आपला संकल्प पूर्ण केला.

१२ सप्टेंबर १९४४ रोजी रंगूनच्या ज्युबली हॉलमध्ये हुतात्मा यतिंद्र दास यांच्या स्मृतीदिनानिमित्त नेताजी यांनी अतिशय भावविभोर भाषण केले आणि ते म्हणाले 'आता आपले स्वातंत्र्य निश्चित आहे, परंतु स्वातंत्र्य बलिदानाची मागणी करते. तुम्ही मला रक्त द्या, मी तुम्हाला स्वातंत्र्य देईन.' भारताच्या इतिहासातच नव्हे; तर जगाच्या इतिहासात सुवर्णाक्षरांनी कोरले गेलेले हे वाक्य देशातील तरूणाईत प्राण फुंकणारे होते.

१६ ऑगस्ट १९४५ रोजी नेताजींचे विमान टोकियोला निघताना तायहोकू विमानतळावर कोसळले आणि १८ ऑगस्ट १९४५ रोजी स्वतंत्र भारताच्या अमरत्वाची घोषणा करणारे, भारतमातेचे लाडके नेताजी सुभाषचंद्र बोस यांचे निधन झाले, परंतु देशभक्तीचा दिव्य प्रकाश प्रज्वलित करून अमर झाले.

## 'वाळवी'ने मारली बाजी

मनोरंजन क्षेत्रात महत्त्वाच्या मानल्या जाणाऱ्या राष्ट्रीय चित्रपट पुरस्कारांची घोषणा शुक्रवारी दिल्ली येथे करण्यात आली. परेश मोकाशी दिग्दर्शित 'वाळवी'ने सर्वोत्कृष्ट मराठी चित्रपटाचा बहुमान पटकावला. याशिवाय 'मुरमूर्स ऑफ द जंगल' या मराठी डॉक्युमेंट्रीने सर्वोत्कृष्ट डॉक्युमेंट्री आणि सर्वोत्कृष्ट निवेदक असे दोन महत्त्वाचे पुरस्कार मिळवले आहेत.




सर्वोत्कृष्ट चित्रपट अट्टम, सर्वोत्कृष्ट अभिनेता ऋषभ शेट्टी (कांतारा), सर्वोत्कृष्ट अभिनेत्री नित्या मेनन (तिरुचित्रबलम) आणि मानसी पारेख, (कच्छ एक्स्प्रेस), सर्वोत्कृष्ट दिग्दर्शक सूरज बडजात्या (उंचाई), सर्वोत्कृष्ट सहाय्यक अभिनेत्री नीना गुप्ता (उंचाई), सर्वोत्कृष्ट सहाय्यक अभिनेता पवन मल्होत्रा (फौजी), सर्वोत्कृष्ट मनोरंजनात्मक चित्रपट कांतारा, सर्वोत्कृष्ट पदार्पण प्रमोद कुमार, सर्वोत्कृष्ट तेलुगु चित्रपट कार्तिकेय २, सर्वोत्कृष्ट तमिळ चित्रपट पोन्नियिन सेल्वन भाग १, सर्वोत्कृष्ट पंजाबी चित्रपट बाघी दि घी, सर्वोत्कृष्ट मल्ल्याळम चित्रपट सौदी वेल्लाक्का सीसी २२५/२००९, सर्वोत्कृष्ट मराठी चित्रपट वाळवी, सर्वोत्कृष्ट कन्नड चित्रपट केजीएफ चाप्टर २, सर्वोत्कृष्ट हिंदी चित्रपट गुलमोहर, सर्वोत्कृष्ट तिवा चित्रपट सिक्यसाल, सर्वोत्कृष्ट बंगाली चित्रपट काबेरी अंतरधन, सर्वोत्कृष्ट आसामी चित्रपट इमुथी पुथी, सर्वोत्कृष्ट संगीत दिग्दर्शत प्रितम, ए.आर. रहेमान, सर्वोत्कृष्ट गायक ब्रह्मास्त्र अरिजितसिंह, सर्वोत्कृष्ट अॅक्शनपट केजीएफ चाप्टर २, सर्वोत्कृष्ट अॅनिमेटेड चित्रपट द कोकोनट ट्री, सर्वोत्कृष्ट निवेदक मुरमूर्स ऑफ द जंगल, बेस्ट डॉक्युमेंट्री मुरमूर्स ऑफ द जंगल ठरली.

दिग्दर्शक परेश मोकाशी आणि अभिनेत्री व लेखिका मधुगंधा कुलकर्णी यांच्या आतापर्यंत एकूण तीन चित्रपटांना राष्ट्रीय पुरस्कारांनी सन्मानित करण्यात आले आहे. 'हरिश्चंद्राची फॅक्टरी', 'एलिझाबेथ एकादशी' यानंतर आता त्यांच्या 'वाळवी' चित्रपटाने राष्ट्रीय पुरस्कारावर नाव कोरले. 'वाळवी' चित्रपटाच्या टीमवर कौतुकाचा वर्षाव होत आहे.

## शेतीला सौरऊर्जा, शेतकऱ्यांमध्ये चैतन्य



देशातील ऊर्जेच्या एकूण वापरापैकी कृषी क्षेत्रासाठी सुमारे २२ टक्के वापर होतो. महाराष्ट्रात सुमारे ४५ लाख कृषी वीज ग्राहक असून ते विजेचा वापर हा मुख्यत: कृषी पंपासाठी करतात. शेतकऱ्यांना पूर्वी चक्रीय पद्धतीने दिवसा आणि रात्री वीजपुरवठा केला जात होता. शेतकऱ्यांना रात्रीच्या वेळी शेतात सिंचन करताना अनेक अडचणींना सामना करावा लागत असे. यावर उपाय म्हणून शासनाने मुख्यमंत्री सौर कृषी वाहिनी योजना १४ जून २०१७ साली सुरू केली. शेतकऱ्यांच्या हितासाठी या योजनेत आवश्कतेनुरूप बदलही करण्यात आले. तथापि, या योजनेच्या अंमलबजावणीचा अनुभव व आव्हाने पाहता या योजनेची अंमलबजावणी मिशन मोडवर करण्याची आवश्यकता निर्माण झाली.

मुख्यमंत्री सौर कृषी वाहिनी योजनेचे सुधारित स्वरूप निश्चित करण्यासाठी महानिर्मिती, महावितरण व महापारेषण कंपनी, महाऊर्जा तसेच पीडब्ल्यूसी संस्था यांच्या प्रतिनिधींचा एक अभ्यासगट प्रधान सचिव (ऊर्जा) यांच्या अध्यक्षतेखाली नियुक्त करण्यात आला. या अभ्यासगटाने विविध शिफारसी आणि मिशन २०२५संदर्भात प्रयास संस्थेचा अहवाल विचारात घेऊन शेतकऱ्यांच्या शेतीपंपाना दिवसा वीजपुरवठा करण्यरसाठी तसेच कृषी फिडर्सचे सौर ऊर्जीकरण मिशन मोडमध्ये करण्याच्या दृष्टीने मुख्यमंत्री सौर कृषी वाहिनी योजना २.० हे अभियान राबविण्याचा निर्णय घेतला.

या अभियानामध्ये मुख्यमंत्री सौर कृषी वाहिनी योजना अधिक सक्षम आणि सुव्यवस्थित करणे, सन २०२५पर्यंत कृषी वीज वाहिनीचे सौर ऊर्जीकरण करण्यासाठी तांत्रिक, आर्थिक कार्यपद्धती आणि देखरेखीचा आराखडा तयार करणे आणि शेतकऱ्यांना दिवसा अखंडित व शाश्वत वीजपुरवठा करणे आणि किमान सात हजार मेगावॅट सौरऊर्जा क्षमता निर्माण करणे, ही उद्दिष्ट्ये निश्चित करण्यात आली.

या अभियानांतर्गत विकेंद्रित प्रकल्प आस्थापित करण्यासाठी वीज उपकेंद्रांच्या परिघातील जमिनीची उपलब्धता, ग्रीड कनेक्टिव्हिटी आणि प्रकल्पाचे आकारमान हे महत्त्वाचे घटक आहेत. हे घटक परिस्थितीनुरूप बदलत असतात. यासाठी काही तरतुदींचा अवलंब करण्यात आला. जसे ०.५ ते १० मेगावॅट क्षमतेचे सौरऊर्जा प्रकल्प आस्थापित करून ते ११ केव्ही/२२ केव्ही स्तरावर जोडणे, ५ ते २५ मेगावॅट क्षमतेचे सौरऊर्जा प्रकल्प आस्थापित करून ते ३३ केव्ही स्तरावर जोडणे, ग्रीड कनेक्टीव्हिटी उपलब्ध असल्यास उजनी, जायकवाडी व इतर जलाशयांवर व्यवहार्यतेच्या अधीन राहून १० ते ५० मेगावॅट क्षमतेचे सौर प्रकल्प ११ केव्ही/२२ केव्ही/३३ केव्ही स्तरावर जोडणे, प्रकल्प समूह तयार करणे अशा विविध तरतुदींचा अवलंब करण्यात आला.

या अभियानासाठी पडीक जमिनीची आवश्यकता असल्याने ती उपलब्ध करून देण्याची जबाबदारी संबंधित जिल्हाधिकाऱ्याकडे सोपविण्यात आली. जिल्हाधिकाऱ्यांनी वीज उपकेंद्रापासून जवळच्या परिघातील खासगी जागा निश्चित करून सौर ऊर्जा प्रकल्पास उभारण्यास द्यावी, असे ठरविण्यात आले. यासाठी प्रकल्पासाठी शासकीय जमिनी नाममात्र एक रुपया या दराने ३० वर्षाच्या कालावधीकरिता भाडेपट्याने आणि पोटभाडेपट्ट्याने उपलब्ध करून देण्याचा निर्णय घेण्यात आला. मुख्यमंत्री सौर कृषी वाहिनी योजना २.० अंतर्गत खाजगी जमीन भाडेपट्ट्यावर घेताना त्या वर्षीच्या नोंदणी व मुद्रांक विभागाने निर्धारित केलेल्या किमतीच्या सहा टक्के दरानुसार परिगणीत केलेला दर किंवा प्रतिवर्ष एक लाख २५ हजार रूपये प्रती हेक्टर यापैकी जी रक्कम जास्त असेल ती रक्कम पायाभूत वार्षिक भाडेपट्टा दर म्हणून गृहीत धरण्यात आला. अशा प्रकारे प्रथम वर्षी आलेल्या पायाभूत वार्षिक भाडेपट्टा दरावर प्रत्येक वर्षी तीन टक्के सरळ पद्धतीने वाढ करण्याचा निर्णय घेण्यात आला.

विकेंद्रित सौरऊर्जा प्रकल्पांतर्गत प्रकल्पाची क्षमता कमी असल्यामुळे प्रकल्प आस्थापनेचा खर्च वाढतो व प्रकल्पाची आर्थिक व्यवहार्यता कमी असते. तरीही कृषी क्षेत्रात सौरऊर्जा उपलब्ध करून देण्याची गरज लक्षात घेता अशा प्रकल्पांना चालना देण्यासाठी विकसकांना प्रोत्साहनात्मक आर्थिक सहाय्य देण्याचे ठरले तसेच या अभियानात भाग घेणाऱ्या विकासकांना नाबार्ड, इरेडा, सार्वजनिक बँकाकडून माफक दराने प्रकल्प निधी मिळण्यासाठी शासनाने आवश्यक ती मदत केली.


शेतकऱ्यांना दिवसा वीजपुरवठा करण्याचे अभियान हे महत्त्वाकांक्षी अभियान असल्याने नोडल एजन्सी, महावितरण, महापारेषण, महानिर्मिती, स्वतंत्र यंत्रणा, महाऊर्जा, प्रकल्प विकासक, स्थानिक प्रशासन, शेतकरी यांचे एकत्रित प्रयत्न झाले. यासाठी उपमुख्यमंत्री आणि ऊर्जामंत्री यांच्या अध्यक्षतेखाली राज्यस्तरीय समिती स्थापन करण्यात आली. अभियानाची यशस्वी व जलदगतीने अंमलबजावणी व्हावी यासाठी प्रधान सचिव (ऊर्जा) यांच्या अध्यक्षतेखाली अंमलबजावणी समिती गठीत करण्यात आली.

या अभियानाचा फायदे पाहता या अभियानामुळे औद्योगिक व व्यावसायिक वीज ग्राहकांवर आकारण्यात येणारी क्रॉस सबसिडी कमी होऊन औद्योगिक व व्यावसायिक ग्राहकांच्या वीज दरात कपात, राज्याच्या विविध जिल्ह्यात मोठी गुंतवणूक आणि ग्रामीण भागात पूर्णवेळ आणि अर्धवेळ रोजगार निर्मिती होत आहे. महावितरण व महापारेषण कंपनीची वितरण प्रणालीसुद्धा बळकट झाली. त्याचप्रमाणे शेतकऱ्यांच्या कृषीपंपाना योग्य त्या भाराने वीज पुरवठा होण्यास मदत झाली. सौर ऊर्जा प्रकल्पासाठी भाडेपट्ट्याने जमीन देणाऱ्या शेतकऱ्यांना २५ वर्षाच्या कालावधीकरिता शाश्वत उत्पन्नाचा स्त्रोत निर्माण झाला आणि राहणीमानाचा दर्जा व आर्थिक स्तर उंचावण्यास मदत झाली. त्याचबरोबर सामाजिक फायदासुद्धा झाला आहे.

**–संजय डी. ओरके,**
विभागीय संपर्क अधिकारी (ऊर्जा)

# मुख्यमंत्री माझी लाडकी बहीण योजनेचा जिल्हास्तरीय शुभारंभ

## पात्र महिला वंचित राहणार नाही -जिल्हाधिकारी



**रायगड : रामप्रहर वृत्त**

मुख्यमंत्री-माझी लाडकी बहीण योजना हा राज्य शासनाचा क्रांतिकारी निर्णय आहे. महिलांचे आरोग्य, पोषण आणि त्यांच्या आर्थिक स्वावलंबनासाठी ही महत्त्वाकांक्षी योजना आहे. जिल्ह्यात या योजनेच्या प्रभावी अंमलबजावणी करण्यात येत आहे. एकही पात्र महिला या योजनेपासून वंचित राहणार नाही, यासाठी यंत्रणांनी दक्ष राहावे, असे निर्देश जिल्हाधिकारी किशन जावळे यांनी आज येथे दिले.

मुख्यमंत्री माझी लाडकी बहीण योजनेचा जिल्हास्तरीय शुभारंभ होरायझन सभागृह अलिबाग येथे झाला. त्यावेळी ते बोलत होते. या वेळी आमदार महेंद्र दळवी, माजी आमदार अनिकेत तटकरे, मुख्य कार्यकारी अधिकारी डॉ. भरत बास्टेवाड, अतिरिक्त मुख्य कार्यकारी सत्यजित बडे, उपजिल्हाधिकारी (सा.प्र.) रविंद्र शेळके, उपविभागीय अधिकारी मुकेश चव्हाण, तहसिलदार विक्रम पाटील, जिल्हा व महिला बाल विकास अधिकारी विनित म्हात्रे, जिल्हा व महिला बाल विकास अधिकारी जि.प.निर्मला कुचिक आदि उपस्थित होते.

या वेळी जिल्हाधिकारी जावळे म्हणाले की, मुख्यमंत्री माझी लाडकी बहीण योजनेच्या अंमलबजासाठी शासनाकडून निर्देश प्राप्त होताचा तत्काळ जिल्ह्यातील विविध विभागांच्या बैठकीचे आयोजन करुन या याजनेची अंमलबजावणी करण्याच्या सूचना संबंधित अधिकाऱ्यांना देण्यात आल्या. या योजनेचा लाभ मिळण्यासाठी आवश्यक असलेल्या कागदपत्रामध्ये उत्पन्नाच्या दाखल्याऐवजी पिवळे किंवा केसरी रेशनकार्ड हा पुरावा ग्राह्य धरावा, अशी शासनाला विनंती केली होती. त्यानुसार या योजनेच्या लाभासाठी पिवळे किंवा केसरी रेशनकार्ड हा पुरावा ग्राह्य धरावा असा शासनाचा निर्णय झाला तसेच आदिवास प्रमाणपत्राबाबतही शासनाने पंधरा वर्षांचा पुरावा ग्राह्य धरण्यात यावा हा चांगला मार्ग काढला. त्यामुळे ही योजना एकदम सोपी झाली.

अंगणवाडी सेविकेच्या हातात योजनेचे काम दिले त्यांनी प्रामिणकपणे काम केले. जिल्ह्यात ही योजना विहित वेळेत, अचूक पध्दतीने राबविली गेली ही अभिमानाची बाब आहे. पहिल्या दोन महिन्यांचे पैसे पात्र लाभार्थी महिलांच्या खात्यात पोहचले. योजनेच्या अंमलबजावणीत रायगड जिल्हा हा सर्वात पुढे होता. आशा वर्कर व अंगणवाडी सेविका शासनाचे कर्मचारी यांचे यात मोठे योगदान आहे. एक कोटीपेक्षा जास्त लोकांना लाभ देणारी ही योजना यशस्वीपणे राबविली गेली. या योजनेचे शंभर टक्के उद्दिष्ट पूर्ण करावयाचे आहे. जिल्ह्यात या योजनेसाठी तीन लाख ५२ हजार लाभार्थी महिला पात्र ठरल्या आहेत. अजून ९० हजार अर्ज पात्र करण्याचे काम सुरू आहे. जिल्ह्यात जवळ जवळ साडेचार लाखाचा आकडा आपण नक्कीच पार करु. पात्र असलेली कुठलीच भगिनी या योजनेपासून वंचित राहणार नाही, असेही त्यांनी या वेळी सांगितले.

या वेळी जिल्हाधिकारी तसेच आमदार महोदयांच्या हस्ते महिलांना प्रातिनिधिक स्वरुपात प्रमाणपत्रांचे वाटप करण्यात आले. या जिल्हास्तरीय कार्यक्रमासाठी महिला मोठया संख्येने उपस्थित होत्या.

आमदार महेंद्र दळवी म्हणाले की, जिल्ह्यातील महिलांच्या सक्षमीकरणासाठी ही योजना लागू केल्याबद्दल राज्यशासनास मन:पूर्वक धन्यवाद देतो. महिलांच्या सर्वांगीण विकासाचा उदात्त हेतू डोळ्यासमोर ठेवून ही योजना तयार करण्यात आली आहे. हे राज्य शासन महिलांना आर्थिक व सामाजिक दृष्टया सक्षम करण्यासाठी त्यांच्या पाठीशी खंबीरपणे उभे आहे. राज्य शासनामार्फत महिलांच्या कल्याणासाठी विविध योजना राबविण्यात येत आहेत. मुख्यमंत्री-माझी लाडकी बहीण' योजनेचा लाभ जिल्ह्यातील सर्व भाता-भगिनींना देण्यात यावा. या योजनेचे अर्ज भरण्यासाठी अंगणवाडी सेविकांचे मोठे योगदान आहे.

# आगामी सण, उत्सव आनंदात व शांततेत साजरे करा

## माणगावच्या बैठकीत पोलिसांचे आवाहन



**माणगाव : प्रतिनिधी**

आगामी येणारे दहीहंडी, गणेशोत्सव यांसारखे सण, उत्सव आनंदात व शांततेत साजरे करा, असे अवाहन माणगांव तालुक्याचे उपविभागीय पोलीस अधिकारी पुष्कराज सूर्यवंशी यांनी केले.

येणाऱ्या विविध सण व उत्सवाच्या निमित्ताने तालुक्यात शांतता व सुव्यवस्था राखली जावी या उद्देशाने माणगांव पोलीस ठाणे येथे शनिवारी (दि.१७) सकाळी शांतता कमिटीची सभा उपविभागीय पोलीस अधिकारी पुष्कराज सूर्यवंशी व पोलीस निरीक्षक निवृत्ती बोऱ्हाडे यांच्या उपस्थितीत आयोजित करण्यात आली होती. या सभेत पोलीस अधिकारी पुष्कराज सूर्यवंशी यांनी उपस्थितांना मार्गदर्शन केले.

या सभेला शांतता कमिटीचे सभासद संजयआण्णा साबळे, नगराध्यक्ष ज्ञानदेव पवार, अस्लम राऊत, अल्ताफदादा धनसे, सामाजिक कार्यकर्त्या शर्मिला सत्वे, मोर्बा सरपंच शौकत रोहेकर, उपसरपंच राजू मोरे, रवींद्र भिकू मोरे, सुभाष भोनकर, शादाब गैबी, लक्ष्मण दळवी, रमेश जैन, सुरेश जैन, प्रसाद धारिया, इरफान हाजीते, गुलजार खान, इस्माईल करदेकर, बशीर करेल, संजय ओसवाल आदींसह इतर सभासद व मोहल्ला कमिटी सभासद उपस्थित होते.

या सभेत सभासदांनी विविध सूचना मांडल्या. या सभेत मार्गदर्शन करताना पोलीस अधिकारी पुष्कराज सूर्यवंशी म्हणाले कि, आपल्या भागात दहीहंडी व गणेशोत्सव हे सण मोठ्या प्रमाणात साजरे केले जातात. गणपती सणाला मुंबईहुन गावाकडे अनेकजण येत असतात. या सण व उत्सवाच्या काळात कायदा व सुव्यवस्था राखून सर्वांनी जागृत राहून आपले सण आनंदात व शांततेत साजरे करा. आगामी येणारे सण,उत्सव आनंदात व शांततेत साजरे करण्यासाठी सर्वांचे सहकार्य अपेक्षित आहे. माणगांव शहरातील वाहतूक सुरळीत राहण्यासाठी कोणाला कुठल्याही प्रकारचा अडथळा होता कामा नये, वाहने योग्य त्या ठिकाणी वाहन चालकांनी पार्किंग करावे याबाबतीत सर्वांनी सहकार्य करा. माणगांवमधील व्यापारी वर्गाचे दरवर्षी सहकार्य लाभते तसेच सहकार्य यापुढेही लाभेल, अशी अपेक्षा व्यक्त करतो.

माणगांव पोलीस निरीक्षक निवृत्ती बोऱ्हाडे यांनी यावेळी मार्गदर्शन करताना सांगितले कि, सण,उत्सव साजरे करताना आपल्याला गावात कोणत्याही प्रकारचा अनुचित प्रकार घडू नये याची काळजी आपण सर्वांनी घेतली पाहिजे. बांगला देशात घडलेल्या घटनेचे पडसाद आपल्या भागात, आपल्या गावात उमटू नये यासाठी सर्वांनी दक्ष राहणे जरुरीचे आहे. सण,उत्सव गुण्या गोविंदाने सर्वांनी साजरे करा. आपल्या गटार कोणत्याही प्रकारचे वादविवाद, तंटे होणार नाहीत याची काळजी सर्वांनी घेऊन येणारे सण, उत्सव शांततेत व आनंदात साजरे करा असे सांगितले.



**खोपोली : नगर परिषदेच्या डॉ. बाबासाहेब आंबेडकर रुग्णालयातील डॉक्टरांनी काळ्या फित लावून कोलकात्यातील घटनेचा निषेध केला. या वेळी मृत महिला डॉक्टरला श्रद्धांजली वाहण्यात आली.** (छाया : जयवंत माडपे)

# माणगावजवळ अपघातात तरुणीचा मृत्यू

**माणगाव : प्रतिनिधी**

माणगावपासून चार किलोमीटर असणाऱ्या गारळ गावच्या हद्दीत एचपी पेट्रोल पंपाच्या पुढे मुंबई-गोवा महामार्गावर भरधाव ट्रकची ज्यूपिटर स्कूटीला मागच्या बाजूने जोरदार धडक बसली. झालेल्या अपघातात दुचाकीवर पाठीमागे बसलेल्या तरुणीचा जागीच मृत्यू होऊन दुचाकीस्वार जखमी झाला.

अपघात शनिवारी (दि.१७) घडला. या बाबातची फिर्याद वसंत बाळू भिसे (वय ६०, सध्या रा.रापीजी कॉम्प्लेक्स महाड,




मूळ रा.वांगणी ता.रोहा) यांनी माणगाव पोलीस ठाण्यात दिली. अपघाताच्या गुन्ह्याबाबत माणगाव पोलीस सूत्रांकडून मिळालेली माहिती अशी की, यांतील फिर्यादी वसंत बाळू भिसे हे त्यांच्या मालकीची टीव्हीएस ज्यूपिटर स्कूटी (एमएच ६ सीजे ३७०४) ही गाडी महाड ते धाटाव ता. रोहा येथे मागील सीटवर मयत तरुणी सोनाली धनंजय भिसे (वय २९) सध्या रा.रापीजी कॉम्प्लेक्स महाड, मूळ रा.वांगणी ता.रोहा यांना घेऊन मुंबई-गोवा महामार्गाने स्वतः चालवीत घेऊन जात असताना अपघात ठिकाणी आल्यावर यांतील आरोपी रूपेश सूर्यकांत इनामदार (वय ४४, रा.नंदीमाळ नाका ता.पेण) याने त्याचे ताब्यातील ट्रक क्र.एम.एच.०६ ए.क्यू.५७९३ हि गाडी अतिवेगाने चालवून स्कुटीला मागच्या बाजूने जोरदार धडक दिली.

या अपघातात स्कूटीच्या पाठीमागे बसलेली तरुणी सोनाली धनंजय भिसे हीच जागीच मृत्यू झाला तर स्कूटीचालक वसंत बाळू भिसे हे जखमी होऊन दोन्ही वाहनांचे नुकसान झाले.

या अपघाताच्या गुन्ह्याची नोंद माणगाव पोलीस ठाण्यात ट्रकचालकावर गुन्हा दाखल करण्यात आला आहे. अपघाताच्या गुन्ह्याचा अधिक तपास पोलीस निरीक्षक निवृत्ती बोऱ्हाडे यांच्या मार्गदर्शनाखाली सहाय्यक पोलीस निरीक्षक भोसले हे करीत आहेत.

# सोनगाव येथे शैक्षणिक साहित्य वाटप, वृक्षारोपण

**रोहे : प्रतिनिधी**

लायन्स क्लब ऑफ रोहा यांच्या माध्यमातून बुधवारी रोहा तालुक्यातील उपक्रमशील आदर्श शाळा रायगड जिल्हा परिषद प्राथमिक शाळा सोनगाव येथे लायन्स क्लब ऑफ रोहा पदाधिकारी व शाळा व्यवस्थापन समिती, पालक व ग्रामस्थ यांच्या समावेत सोनगाव गावातून हर घर तिरंगाचे औचित्य साधून वृक्ष दिंडी काढून शालेय परिसरात वृक्षारोपण करण्यात आले.

या वेळी इयत्ता पहिली ते चौथीच्या विद्यार्थ्यांना शैक्षणिक साहित्य अंतर्गत दप्तर व रजिस्टर वह्याचे वाटप करण्यात आले.

या वेळी लायन्स क्लब ऑफ रोहाचे अध्यक्ष भाऊसाहेब माने, रोहा उपाध्यक्ष लक्ष्मण शिट्याळकर, ट्रेझरस जयदेव पवार, माजी अध्यक्ष रविंद्र घरत, माजी अध्यक्षा सुश्मिता शिट्याळकर, माजी ट्रेझरस संपदा देशपांडे, अलका नांदगावकर, शाळा व्यवस्थापन समिती सोनगावचे अध्यक्ष दिपक दौलत भोईर, शाळा व्यवस्थापन समिती सोनगावचे माजी अध्यक्ष सुशिल चिंतामणी खांडेकर, उपाध्यक्ष राधा मोहन शेलार, सदस्य सुप्रिया वामन भोईर, सदस्य अर्चना संतोष चव्हाण, कलेश जंगम, ज्ञानेश्वर गोळे, सौरभ उत्तम गोळे, अश्विनी श्रीधर शिंदे, समृद्धी एकनाथ शेलार, कल्याणी संजय खांडेकर, अभिषेक जंगम, निखिल जाधव, राजिप सोनगाव शाळेचे मुख्याध्यापक संतोष लक्ष्मण धोत्रे, उपशिक्षक ब्रिजेश बाळकृष्ण भादेकर, अंगणवाडी सेविका प्रिती गोळे आदी उपस्थित होते.




# हिरवळ महाविद्यालयात ग्रंथपाल दिन उत्साहात

**माणगाव : प्रतिनिधी**

हिरवळ एज्युकेशन ट्रस्ट कॉलेज ऑफ सायन्स (सी.एस.आय.टी.) महाड महाविद्यालयाच्या ग्रंथपाल विभागामार्फत डॉ.एस.आर. रंगनाथन यांच्या जयंतनिमित्त ग्रंथपाल दिन उत्साहात साजरा करण्यात आला.

या निमित्ताने विद्यार्थ्यांसाठी पुस्तक पुनरावलोकन स्पर्धा आयोजित करण्यात आली. प्राचार्य सुदेश कदम यांनी ग्रंथालयाचे जनक डॉ. एस.आर. रंगनाथन यांच्या कार्याविषयी माहिती विद्यार्थ्यांना सांगितली. हिरवळ एज्युकेशन ट्रस्टचे अध्यक्ष किशोर धारिया यांनी सुसज्ज ग्रंथालय हे कोणत्याही शैक्षणिक संस्थेचे हृदय असते त्यामुळे विद्यार्थ्यांमध्ये वाचन संस्कृती वाढवण्यासाठी विद्यार्थ्यांनी महाविद्यालयातील ग्रंथालयाचा पुरेपूर वापर करण्याचे आवाहन केले.

हिरवळ एज्युकेशन ट्रस्टच्या संचालिका सोनाली धारिया यांनीही डिजिटल युगात



ग्रंथालयांची विकसित होत असलेली भूमिका लक्षात घेऊन आपले विचार व्यक्त करताना ग्रंथपाल दिन साजरा करणे म्हणजे पारंपरिक पुस्तकांना महत्त्व देऊन ग्रंथालयातील नवीन बदल स्वीकारण्याचे आवाहन केले.

हिरवळ एज्युकेशन ट्रस्टच्या मुख्य सल्लागार डॉ. संध्या कुलकर्णी यांनी लहानपणापासूनच वाचनाची आवड निर्माण करण्याच्या महत्त्वावर भर देताना ग्रंथालये टीकात्मक विचारांना चालना देतात, ज्ञान वाढवतात आणि वाचनाची सवय विकसित करतात, असे मत व्यक्त केले.

# ग्रंथालय संघातर्फे आर्थिक मदत



**खोपोली : प्रतिनिधी**

राष्ट्रसेवा तालुका वाचनालय खालापूरचे शिपाई विलास गायकवाड यांच्या अकस्मात मृत्यूनंतर त्यांच्या पत्नीला रायगड जिल्हा ग्रंथालय संघाच्या वतीने आर्थिक मदत करण्यात आली आहे. विलास यांनी २० वर्षांपेक्षा अधिक काळ राष्ट्रसेवा तालुका वाचनालयात शिपाई म्हणून काम केले होते.

प्रामाणिक आणि सचोटीने विलास यांनी केलेल्या सेवेची दखल ग्रंथालय संघाने घेत रोहा येथे झालेल्या सभेमध्ये सर्वानुमते विलास यांच्या कुटुंबाला मदतीचा ठराव करण्यात आला होता. जिल्हा ग्रंथालय संघातर्फे १० हजार रुपये त्यांच्या कुटुंबाला देण्याचे निश्चित करण्यात आले. संघाचे अध्यक्ष संजय बोंदार्डे, सहकार्यवाह अभिजित चौधरी, ग्रंथपाल पाष्टे यांच्या उपस्थितीत विलास यांच्या पत्नीला १० हजारांचा धनादेश देण्यात आला.


## जाहीर नोटीस

तमाम लोकांस या जाहीर नोटीशीने कळविणेत येते की, आमचे अशीलांनी मौजे नविन पनवेल पुर्व, ता. पनवेल, जिल्हा रायगड येथील खालील वर्णनाची मिळकत त्या मिळकतीचे विद्यमान १) हकीम अब्देअली अरसिवाला २) फरीदा हकीम अरसिवाला ३) अलि हुसैन हकीम अरसिवाला यांच्याकडून कायम स्वरूपी मालकीहक्काने खरेदी करण्याचे ठरविले आहे. सदरची मिळकत ही त्यांची निर्वेध व बोजारहित मालकीहक्काची व प्रत्यक्ष ताबेकब्जा वहिवाटीतील असून ती विकण्याचा त्यांस हक्क, अधिकार असल्याबाबतचा भरवंसा विद्यमान मालकांनी आमचे अशीलांस दिलेला आहे. त्यावरून आमचे अशीलांनी सदरच्या मिळकतीचा खरेदी व्यवहार करण्याचे ठरविलेले आहे.

**मिळकतीचे वर्णन**

**उपविभाग १/१४, प्लॉट क्र. १५ आणि १७, रोड नं. १२, सेक्टर ११, नविन पनवेल पुर्व ता. पनवेल, जि. रायगड, क्षेत्रफळ ३०१ चौ. मी. त्यापैकी ९८.१६ चौ. मी. बांधीव व २०२.८४ चौ.मी. खुली जागा**

तरी वर वर्णन केलेल्या मिळकतीवर वा मिळकतीसंदर्भात अन्य कोणाचाही कसल्याही प्रकारचा अथवा तिचे कोणत्याही भागावर कोणाचाही विक्री, गहाण, दान, भाडेपट्टा, विक्रीचा करार, वारसाहक्क, लिज, लिएन, चार्ज, पोटगी, ताबा, वहिवाट, इजमेंटरी हक्क, या अथवा इतर कोणत्याही प्रकारचा हक्क, हितसंबंध असल्यास अथवा अन्य कोणत्याही प्रकारे मिळकतीचे खरेदी विक्री व्यवहारास हरकत असल्यास त्यांची हरकत त्यांनी सदरची नोटीस प्रसिध्द झाल्यापासून सात दिवसांच्या मुदतीमध्ये माझे खालील पत्त्यावर प्रथमदर्शनी पुराव्याच्या कागदपत्रांसहित लेखी स्वरूपात हरकत द्यावी.

वरील मुदतीत कोणाचीही, कसलीही लेखी हरकत न आल्यास सदर मिळकतीत कोणाचाही कसल्याही प्रकारचा हितसंबंध नाही असे समजण्यात येईल अथवा तसा हक्क असूनही तो त्यांनी आमच्या अशीलांचे लाभात सोडून दिलेला आहे तसेच सदर मिळकत निर्वेध व बोजारहित आहे, असे समजून आमचे अशील सदर मिळकतीसंदर्भात कायदेशीर खरेदीविक्री व्यवहार पूर्ण करतील. मागाहून मुदतीनंतर आलेली कोणाचीही कसल्याही प्रकारची तक्रार चालणार नाही व तशी कोणतीही तक्रार/ हरकत आमच्या अशीलांवर बंधनकारक राहणार नाही, याची सर्वांनी नोद घ्यावी. यासाठी ही नोटीस दिली आहे.

**दिनांक : १७/०८/२०२४**

**सही/-**
**(अॅड. सौ. संगीता चेतन मोरे)**
**मो. नं. ९२७००२९७०४, ८८७९८८३९२०,**

**पत्ता- फ्लॅट नं १०१, विंग ए, हरीमंदिर को-ऑप. हौसिंग सोसायटी लि, 'प्लॉट नं. ७९, ८०, ८१, सेक्टर १०, नवीन पनवेल, (पु), ता. पनवेल, जि. रायगड, ४१०२०६**

## जाहीर नोटीस

तमाम लोकांस या जाहीर नोटीशीने कळविणेत येते की, आमचे अशिल श्री. दत्तात्रेय नारायण म्हात्रे, यांनी खालील वर्णन केलेली मिळकत दिनांक २४/०५/२०१० रोजी दस्त नं. ६५४९/२०१० या रजिस्टर्ड खरेदीखताने श्रीमती. प्रिया प्रताप आरेकर व श्री. प्रताप रामचंद्र आरेकर, यांचे कडून खरेदी केलेली आहे

**मिळकत वर्णन**

**सदनिका क्र. १०१, पहिला मजला, रुपक बिल्डींग, प्लॉट क्र. ०२. सव्र्हे क्र ४२ हिस्सा नं. ४ए/२, मौजे-शिलोत्तर रायचुर, ता. पनवेल, जि. रायगड क्षेत्रफळ ४६४ चौ फुट बिल्टअप**

वरील नमुद मिळकतीचे विदयामान मालक श्री. दत्तात्रेय नारायण म्हात्रे यांच्याकडुन मिळकतीचे साखळी दस्त गहाळ झालेले आहेत ते खालीलप्रमाणे:-

१. प्रिया प्रताप आरेकर व प्रताप रामचंद्र आरेकर रा. सुयोग को. ऑप. हो. सोसा., बी-१७८-ए-६२११, मानमवार नगर, विक्रोळी, मुंबई- ८३ व विजय गोविंद पवार रा. सावीत्रीबाई फुले वसाहत, अनिक बस डेपो, प्रतीक्षा नगर, सायन मुंबई-२२ यांच्यामध्ये दिनांक ११/१२/२००७ रोजी दस्त नं. ९६८७/२००७ हा रजिस्टर्ड खरेदीखताचा मुळ दस्त.

२. विजय गोविंद पवार रा. सावीत्रीबाई फुले वसाहत, अनिक बस डेपो, प्रतीक्षा नगर, सायन मुंबई-२२ व मे. उन्मेश हाऊस मेकर्स तर्फ एल आर वेंकटरामण यांचे कु. मु. पत्रधारक अशोक आर गुप्ता पत्ता-२२५. अरेंजा कॉर्नर, से १७, वाशी नवी मुंबई यांच्यामध्ये दिनांक २४/०३/२००७ रोजी दस्त नं. २१३५/२००५ हा रजिस्टर्ड खरेदीखताचा मुळ दस्त

वर नमुद केलेले दोन दस्तावेज रूम शिफ्टींग करता वेळी सुकपुर परीसरात गहाळ झाल्याबाबतची दि. ०५/०८/२०२४ रोजी खांदेश्वर पोलिस ठाणे नवीमुंबई येथे हरवलेल्या मालमत्ताची नोद क्रमांक १२३२/२०२४ कडे तक्रार नोंदविली आहे. तसेच गहाळ झालेल्या कागदपत्राच्या आधारे कोणीही कोणताही व्यवहार करू नये. तरी संबंधित कागदपत्र कोणास सापडल्यास खालील पत्त्यावर संपर्क करावा. तसेच वर वर्णन केलेल्या निवासी सदनिकेवर संदर्भात अन्य कोणाचाही कोणत्याही प्रकारचा हक्क, हितसंबंध वा हरकती असल्यास त्यांनी सदरची नोटीस प्रसिध्द झाल्यापासून ३० दिवसांच्या मुदतीमध्ये खालील पत्त्यावर प्रथमदर्शनी पुराव्याच्या कागदपत्रांसहित लेखी स्वरूपात हरकत द्यावी. वरील मुदतीत कोणाचीही, कसलीही लेखी हरकत न आल्यास अशिलास वर नमुद मिळकतीचे वरील नमुद दस्त हरविले आहेत व त्याबाबत नोटीस देवुनही कोणीही कसलीही दावा केलेला नाही असा दाखला देण्यात येईल तनंतर येणाऱ्या हरकतींचा विचार केला जाणार नाही. याची सर्वांनी नोद घ्यावी. यासाठी ही नोटीस दिली आहे.

**दिनांक : १७/०८/२०२४**

**सही/-**
**(अॅड. सौ. संगीता चेतन मोरे)**
**मो. नं. ९२७००२९७०४, ८८७९८८३९२०,**

**पत्ता- फ्लॅट नं १०१, विंग ए, हरीमंदिर को-ऑप. हौसिंग सोसायटी लि, 'प्लॉट नं. ७९, ८०, ८१, सेक्टर १०, नवीन पनवेल, (पु), ता. पनवेल, जि. रायगड, ४१०२०६**

## निवडक

### पोलिसांची उपनिरीक्षकपदी बढती

**पनवेल :** शहर पोलीस ठाण्यात वेगवेगळ्या विभागात कार्यरत असणार्या तीन कर्मचार्‍यांना पोलीस उपनिरीक्षकपदी बढती मिळाली आहे. पनवेल शहर पोलीस ठाण्यातील अंबादास कांबळे, संजय धायेराव व संतोष म्हात्रे यांना बढती मिळून ते पोलीस उपनिरीक्षकपदी पदोन्नती मिळाली आहे व त्यातील अंबादास दानवे यांची तुर्भे पोलीस ठाणे, संजय धायेराव यांची सानपाडा पोलीस ठाणे तर संतोष म्हात्रे यांची सीबीडी पोलीस ठाणे येथे नियुक्ती करण्यात आली आहे. या वेळी परिमंडळ २ चे पोलीस उपायुक्त विवेक पानसरे, वरिष्ठ निरीक्षक नितीन ठाकरे, निरीक्षक प्रवीण भगत, बाळकृष्ण सावंत यांच्यासह इतर अधिकारी व कर्मचार्‍यांनी त्यांचे अभिनंदन करून त्यांना शुभेच्छा दिल्या आहेत.

### प्रशांत मोहितेंनी स्वीकारला पदभार

**पनवेल :** परिमंडळ २ उपायुक्तपदी प्रशांत मोहिते यांची नेमणूक करण्यात आली असून त्यांनी तात्काळ पदभार स्वीकारला आहे. यापूर्वी असणारे विवेक पानसरे यांची बदली बृहन्मुंबई येथे झाली असून त्यांच्या बदल्यात पोलीस उपायुक्त विशेष शाखा नवी मुंबई येथे कार्यरत असणारे प्रशांत मोहिते यांची बदली परिमंडळ २ पोलीस उपायुक्तपदी झाली असून त्यानुसार त्यांनी पदभार स्वीकारला आहे.

### उर्दू गर्ल्स शाळेत ध्वजारोहण

**पनवेल :** पीपल्स ॲण्ड पॅरेन्टस असोसिएशन, पनवेल



अंतर्गत चालणारी मायनॉरिटी उर्दु गर्ल्स शाळेमध्ये स्वातंत्र्यदिन उत्साहात साजरा करण्यात आला. या वेळी संस्थेचे उपाध्यक्ष जुबेर पिट्टू यांच्या हस्ते ध्वजारोहण करण्यात आले.

### जेएनपीएमध्ये स्वातंत्र्य दिन साजरा

**उरण :** जवाहरलाल नेहरू पत्तन प्राधिकरण येथे देशाच्या



७८वा स्वातंत्र्य दिनाचा सोहळा मोठ्या उत्साहात साजरा झाला. या सोहळ्याचे प्रमुख पाहुणे आणि जनेप प्राधिकरणाचे अध्यक्ष उन्मेष शरद वाघ, (भा.रा.से.) यांच्या आगमनाने समारंभाची सुरुवात झाली. जेएनपीए प्राधिकरण येथे उन्मेष शरद वाघ यांना केन्द्रीय औद्योगिक सुरक्षा दलाचे (सीआयएसएफ) वरिष्ठ कमांडट राम मोहन यांनी गार्ड ऑफ ऑनर प्रदान केला. सर्व जनेप लेबर ट्रस्टी, विभाग प्रमुख (एचओडी), भागधारक आणि जेएनपीए प्राधिकरणातील कर्मचारीवर्ग स्वातंत्र्य दिनाच्या या कार्यक्रमात मोठ्या उत्साहाने सहभागी होऊन या कार्यक्रम यशस्वीरीत्या झाला.

# बॉम्बच्या धमकीने 'ओरियन' केला रिकामा

## वाशीतील इन ऑर्बिट मॉलला आलेल्या मेलमुळे अलर्ट




**पनवेल : वार्ताहर**

वाशी येथील इन ऑर्बिट मॉलमध्ये बॉम्ब ठेवल्याचा धमकीचा मेल आला आणि काही क्षणातच मॉल रिकामा करण्यात आला. या मॉलसह एकूण २६ मॉलची नावे या मेलमध्ये असल्याने खबरदारीचा उपाय म्हणून पनवेलच्या ओरायन मॉललादेखील रिकामा करण्यात आले. सध्या सर्व ठिकाणी तपासणी करण्यात येत आहे.

वाशी येथील इन ऑर्बिट मॉलसह २५ मॉलमध्ये बॉम्ब ठेवला असल्याचा धमकीचा मेल इन ऑर्बिट मॉलला आला होता. नवी मुंबईतील वाशीमधील इनॉर्बिट मॉलमध्ये बॉम्बची धमकी देण्यात आली आहे. नवी मुंबईमधील वाशी रेल्वे स्टेशन परिसरात असलेल्या इनॉर्बिट मॉलमध्ये बॉम्ब असल्याचा ई-मेल मॉल प्रशासनाला करण्यात आला आहे. हा मॉल सर्वात गजबजलेला मॉल समजला जातो. आणि याच नवी मुंबई पोलीस आणि अग्निशमन दल घटनास्थळी दाखल झाले आहे. प्रशासनाला मॉलमध्ये बॉम्ब असल्याचा ई-मेल मिळताचा संपूर्ण मॉल खाली करण्यात आला आहे. बॉम्ब शोधक, नाशक पथकदेखील घटनास्थळी दाखल झालं आहे. आता संपूर्ण मॉलची तपासणी करण्यात येत आहे. या मेलमध्ये पनवेलच्या ओरायन मॉलचेही नाव असल्याचे समजते आहे. म्हणून खबरदारीचा उपाय म्हणून पोलिसांनी या मॉलला जाऊन नागरिकांना मॉलमधून बाहेर जाण्याचे आवाहन केले.

अचानक पोलिसांनी केलेल्या आवाहनानंतर नागरिकांमध्ये भितीदायक वातावरण निर्माण झाले होते. दरम्यान, पनवेलच्या ओरायन मॉलमध्येही पोलीस तपासणी करत आहेत.

## तुपगाव ग्रामपंचायत हद्दीत व्यायामशाळेचे भूमिपूजन

**मोहोपाडा : प्रतिनिधी**

आमदार महेश बालदी यांच्या स्थानिक आमदार निधीतून तुपगांव गावासाठी सात लाख रुपये व्यायाम शाळेसाठी मंजूर झाले असून ७८व्या स्वातंत्र्य दिनाचे औचित्य साधून तुपगाव ग्रामपंचायतीचे सरपंच रवींद्र कुंभार यांच्या हस्ते व्यायामशाळेचे भूमिपूजन करण्यात आले.

सध्याच्या धकाधुकीच्या जीवनात आरोग्याच्या विविध तक्रारी निर्माण झाल्या आहेत. यासाठी परिसरातील युवकांना आपली शरीर बांधा मजबूत करता यावा, व्यायामातून त्यांचे आरोग्य सुधारावे यासाठी व्यायामशाळा सुरू करण्याचा सरपंच रवींद्र कुंभार यांचा मानस होता. अखेर स्वातंत्र्य दिनानिमित्त तुपगावात व्यायामशाळेचे भूमिपूजन




करण्यात आले.

या वेळी तुपगांव ग्रामपंचायतीचे उपसरपंच सुयोग भालेकर, सचिन साखरे, कांताताई नागावकर ग्राम पंचायत सदस्य, भारतीय जनता पक्ष खालापुर आरोग्य सेल अध्यक्ष विजय ठोसर, गावचे पोलीस पाटील किशोर गुरव, नथुराम गुरव, कल्पेश गुरव, स्वप्निल नागावकर, मनोज गुरव, सतीश सोनवणे, शेखर मोरे, रमेश पाटील, दत्तात्रय हातनोलकर, सचिन कालेकर, सचिन कुंभार, सचिन साळवी, मनोज कुंभार, चैतन्य कुंभार, देवेंद्र कुंभार, प्रशांत परीट, सनी कुंभार, मृगन व्हेलार, गणेश गुरव, केशव गुरव, देवेंद्र कुंभार, देविदास गुरव, दिलीप साळुखे, दिलीप गुरव, रवींद्र दळवी, राकेश दळवी, अविनाश दळवी, यशवंत बिरवाडकर, रोहित गुरव, मंगेश गुरव आदी ग्रामस्थ, तरुण मोठ्या संख्येने उपस्थित होते. या वेळी कल्पेश गुरव यांनी आमदार महेश बालदी यांचे ग्रामस्थांच्या वतीने आभार मानून पुढील कार्यासाठी शुभेच्छा दिल्या.

## पनवेलमध्ये हर घर तिरंगा यात्रा



**पनवेल : रामप्रहर वृत्त**

अंजुमन आय. इस्लाम टेक्निकल कॅम्पस व ए.आर. काळसेकर तंत्रनिकेतन पनवेल, महाविद्यालयातील बहुसंख्य विद्यार्थी हातात तिरंगा घेऊन भव्य तिरंगा यात्रा काढून देश प्रेम, देश भावनेचे उत्तम प्रदर्शन घडवून आणले.

या तिरंगा यात्रेमध्ये विद्यार्थी व शिक्षकवृदांचा सहभाग प्रकपनि जाणवत होता महाविद्यालयाच्या प्रवेश द्वारापासून तिरंगा यात्रेला सुरुवात झाली. अंजुमन आय. इस्लामचे प्रेसिडेंट व पद्मची अवार्ड डॉ. शहीर काझी, नवी मुंबईचे चेअरमन बुरहान हरीस, डायरेक्टर डॉ. रमजान खाटीक, इंजिनीरिंग कॉलेजचे डीन डॉ. राजेंद्र मगर, तंत्रनिकेतनचे प्राचार्य प्रो. आरीफ शेख, स्कूल ऑफ फार्मसीचे डीन. डॉ. शारिक सय्यद, विभाग प्रमुख प्रो. अबू सुफीयान यांनी सुरुवात करून दिली.

तिरंगा यात्रा अत्यंत उत्साहात महाविद्यालयाच्या प्रवेशद्वारापासून ते ठाणा नाका चौकापर्यंत काडण्यात जाली. प्रवेशद्वार क्र. १वर यात्रेचे रूपांतर सभेत करून या ठिकाणी विद्यार्थी व शिक्षक वृंदानी देश भक्ती वर आपली मनोगते सादर केली. आभार मानून सभा संपुष्टात आली.

राष्ट्रीय सेवा योजना (एनएसएस) प्रमुख डॉ. शिवाजी पवार व प्रा. विजया अँदिकर मंडस, डॉ. वर्षा पवार, प्रा. हिना मर्चन्ट यांनी विशेष परिश्रम घेऊन या कार्यक्रमाला उत्तमरित्या यशस्वी केले. पनवेल शहर पोलीस ठाणे मार्फत यात्रेला विशेष सुरक्षा पुरविण्यात आली.

## घरोघरी तिरंगा अभियान उत्साहात



**नवी मुंबई : रामप्रहर वृत्त**

घरोघरी तिरंगा अभियान मॉडर्न स्कुलमध्ये उत्साहात साजरे झाले. देशभरात यावर्षी ९ ऑगस्ट ते १५ ऑगस्ट या काळात घरोघरी अभियान राबविण्यात आले. रयत शिक्षण संस्थेच्या मॉडर्न स्कूल, वाशी येथेही हे अभियान उत्साहात राबविण्यात आले.

९ ऑगस्ट ते १५ ऑगस्ट दरम्यान विविध कार्यक्रम घेण्यात आले. ९ ऑगस्टला अभियानाला सुरुवात करण्यात आली असून शाळेच्या आवारात तिरंगा रॅली काढण्यात आली. या अभियाना अंतर्गत विद्यार्थ्यांची मैत्री दौड घेण्यात आली. त्याचप्रमाणे विद्यालयाच्या आवारात मोठा तिरंगी फलक ठेऊन त्यावर स्वाक्षर्‍या घेण्यात आल्या. स्वातंत्र्य सैनिक व ज्येष्ठ सैनिकांना विद्यालयात बोलावून त्यांचा स्तकात करण्यात आला. १५ ऑगस्ट रोजी झेंडा वंदन करून केंद्र सरकारने प्रसारित केलेली तिरंगा प्रतिज्ञा घेण्यात आली. या वेळी विद्यार्थ्यांनी विविध सांस्कृतिक कार्यक्रम साजरे केले.

या कार्यक्रमास प्राचार्या सुमित्रा भोसले, प्राथमिक मराठी विभागाचे मुख्याध्यापक रवींद्र वाघ, पर्यवेक्षक आबासाहेब वाघ, मनीषा सकपाळ, हना सरेला, मनीषा शिर्के, मंगल शिंदे यांच्यासह शिक्षक, पालक व विद्यार्थी उपस्थित होते.

## 'राष्ट्र उभारणीसाठी भांडवली बाजारपेठेचा विकास सुरूच ठेवणार'

**पनवेल : रामप्रहर वृत्त**

नॅशनल स्टॉक एक्सचेंज अर्थात एनएसई यापुढेही गुंतवणूकदार जागरूकता व संरक्षणासाठी, त्याचबरोबर राष्ट्र उभारणीसाठी भांडवली बाजारपेठेचा विकास सुरूच ठेवणार आहे, असा विश्वास एनएसईचे व्यवस्थापकीय संचालक व सीईओ आशिषकुमार चौहान यांनी दिला.

भारताच्या ७८व्या स्वातंत्र्य दिनानिमित्त त्यांनी आपले मनोगत व्यक्त करताना, प्रगतिशील आणि समृद्ध देशाचे स्वप्न पूर्ण करत असताना आपल्या स्वातंत्र्य सैनिकांच्या त्यागाचा कायम सन्मान करूया, असे म्हटले. भारतातील संपत्ती निर्मितीचे उत्प्रेरक आणि आघाडीचे रेग्युलेटर



या नात्याने आम्ही अधिक बळकट आणि सर्वसमावेशक राष्ट्र उभारणीसाठी बांधील आहोत.

एनएसई यापुढेही गुंतवणूकदार जागरूकता व संरक्षणासाठी, तसेच राष्ट्र उभारणीसाठी सातत्यपूर्ण प्रयत्नातून भांडवली बाजारपेठेचा विकास सुरूच ठेवणार आहे आणि त्यानुसार कार्य करणार आहे, असे त्यांनी अधोरेखित करून सर्व देशवासीयांना स्वातंत्र्य दिनाच्या शुभेच्छा दिल्या.

## खारघरच्या रामशेठ ठाकूर पब्लिक स्कूलची संगीत क्षेत्रात उल्लेखनीय कामगिरी

**खारघर : रामप्रहर वृत्त**

भारत विकास परिषद नेरूळ खारघर शाखेतर्फे शनिवारी (दि. १७) आयोजित राष्ट्रीय समूह गीत गायन स्पर्धेत खारघरमधील रामशेठ ठाकूर पब्लिक स्कूलच्या विद्यार्थ्यांनी नवी मुंबई विभाग पातळीवर हिंदी, संस्कृत व मराठी



लोक गीतात परितोषिक मिळवून आपल्या शाळेचे नाव नवी मुंबईत उज्ज्वल केले.

हिंदी गीत गायन स्पर्धेत प्रथम, संस्कृत गीत गायन स्पर्धेत प्रथम व मराठी गीत गायन स्पर्धेत द्वितीय, अशी तीन पारितोषिके पटकावून त्यांची पुढील राज्यस्तरावर निवड करण्यात आली.

या स्पर्धेत सहभागी विद्यार्थी -पंकज मोकल, तीर्थ हांडे, रुद्र भट, समर रणशेवरे, यशिका चव्हाण, यशिता बडेकर, समीक्षा रेवने, अफशीन सदात, अनाया कोटम्बे, वृंदा बोरवनकर भार्गवी गावडे या विद्यार्थ्यांचे व त्यांना मार्गदर्शन करणारे संगीत शिक्षक दत्तात्रय मोकल, मधुकर धोंगडे, यांचे संस्थेचे चेअरमन लोकनेते रामशेठ ठाकूर आणि मुख्याध्यापिका राज अलोनी यांनी विद्यार्थ्यांना राज्य पातळीवर यशस्वी होऊन देश पातळीवर भरघोस यश मिळवून शाळेचे नाव उज्ज्वल करावे, यासाठी शूभेच्छा दिल्या.

## केविन डायसच्या चित्रांची जलरंग महोत्सवात निवड

**पनवेल : रामप्रहर वृत्त**

पनवेल येथील चित्रकार केविन डायस याची प्रतिष्ठित आंतरराष्ट्रीय आयडब्ल्यूएस ऑलिम्पियार्ट २०२४, जगातील सर्वांत मोठा जलरंग महोत्सव, स्पर्धा आणि प्रदर्शनात भारताचे प्रतिनिधित्व करण्यासाठी निवड झाली आहे.

इंटरनॅशनल वॉटर कलर सोसायटी ऑफ इंडियाने आयोजित केलेला हा कार्यक्रम दिल्ली मेट्रोपॉलिटन एज्युकेशन (डीएमई कॉलेज) नोएडा, नवी दिल्ली, भारत येथे होणार आहे. स्पर्धेतील सर्वांत तरुण सहभागी असलेल्या केविनने त्याची दोन जलरंगातील चित्रे प्रदर्शनासाठी निवडली आहेत.

या कार्यक्रमात जगभरतून ६० देशांतील कलाकारांचा सहभाग असणार आहे. १,६०० एंट्रीमधून जगभरातून केवळ ५५० कलाकार निवडले गेले. महोत्सवात भव्य



उद्घाटन समारंभ, प्रदर्शन, प्रात्यक्षिके, कार्यशाळा, सांस्कृतिक कार्यक्रम, कला प्रवास, कला चर्चा आणि ऑन-द-स्पॉट निसर्ग चित्र स्पर्धा यांचा समावेश असेल.

या कार्यक्रमात सहभागी होणे ही सुवर्णसंधी असून स्वप्न साकार झाल्याचे मत केविनने व्यक्त केले. हे त्याला जगभरातील आंतरराष्ट्रीय कलाकारांना भेटण्यासाठी आणि स्पर्धा करण्यासाठी एक महत्त्वपूर्ण व्यासपीठ देते.

## युवा महोत्सवात बीसीटी लॉ कॉलेजची उत्कृष्ट कामगिरी




**पनवेल : रामप्रहर वृत्त**

मुंबई विद्यापीठाने नुकतेच युवा महोत्सव २०२४-२५चे आयोजन केले होते, ज्यात रायगड उत्तर विभागातील २८ महाविद्यालयांनी सहभाग घेतला. जनार्दन भगत शिक्षण प्रसारक संस्थेचे नवीन पनवेलमधील भागुबाई चांगू ठाकूर (बीसीटी) विधी महाविद्यालयाने १९ स्पर्धांमध्ये ३२ विद्यार्थ्यांनी भाग घेऊन महत्त्वपूर्ण कामगिरी बजावली.

महाविद्यालयातील विद्यार्थ्यांनी उत्कृष्ट कामगिरी करत अनेक स्पर्धांमध्ये अव्वल स्थान प्राप्त केले. स्किट गटाने प्रतिष्ठित पहिला क्रमांक पटकावला, ज्यात सहा विद्यार्थ्यांनी सहभाग घेतला: रचिता जाधव (तिसरी वर्ष बीए एलएलबी), चैत्राली काणे (चौथी वर्ष बीए एलएलबी), रजदीपा माधवी (पाचवी वर्ष बीएलएस), तेजल सोनावले (पाचवी वर्ष बीएलएस), श्रुणा कोळी (दुसरी वर्ष बीए एलएलबी) आणि अपूर्वा जोगळे (दुसरी वर्ष बीए एलएलबी). त्यांचे आकर्षक सादरीकरण या महोत्सवाचे विशेष आकर्षण ठरले

रांगोळी स्पर्धेत दुसरे वर्ष बीए एलएलबीमधील श्रावणी मोकल हिने तिसरा क्रमांक मिळवला. तिने आपल्या सर्जनशीलतेने परीक्षकांना प्रभावित केले. त्याचप्रमाणे दुसरे वर्ष बीए एलएलबीमधील सोहम जोशी यांनी क्लासिकल इन्स्ट्रुमेंटल स्वरवाद्य स्पर्धेत आपल्या हार्मोनियम वादनासाठी तिसरा क्रमांक मिळवला.

काही विद्यार्थ्यांना त्यांच्या उत्कृष्ट प्रयत्नांसाठी उत्तेजनार्थ बक्षिसे देऊन गौरविण्यात आले. चौथे वर्ष बीए एलएलबीची विद्यार्थिनी खुशी दामले हिला ऑटो रिक्षा स्टँड या विषयावर तिच्या भावस्पर्शी चित्रकलेसाठी ऑन-द-स्पॉट पेंटिंग स्पर्धेत उत्तेजनार्थ पारितोषिक मिळाले. पाचवे वर्ष बीएलएसमधील रजदीपा माधवी हिला कथाकथन स्पर्धेत उत्तेजनार्थ पारितोषिक मिळाले. दुसरे वर्ष बीए एलएलबीमधील प्रणिता वाघमारे हिला भारतीय शास्त्रीय नृत्य श्रेणीत भरतनाट्यम नृत्यासाठी उत्तेजनार्थ पारितोषिक मिळाले. शेवटी, तिसरे वर्ष बीए एलएलबीमधील रचिता जाधव हिला मोनो ॲक्ट प्ले स्पर्धेत उत्तेजनार्थ पारितोषिक देण्यात आले.

युवा महोत्सव २०२४-२५मध्ये भागुबाई चांगू ठाकूर विधी महाविद्यालयाने मिळवलेल्या यशामुळे त्यांच्या विद्यार्थ्यांच्या कष्ट वसमर्पणाचा सन्मान झाला आहे. विविध स्पर्धांमधील त्यांचे यश हे महाविद्यालयाच्या शैक्षणिक उत्कृष्टता आणि सांस्कृतिक सर्जनशीलता दोन्हींचे पालन करण्याच्या वचनबद्धतेचे प्रतीक आहे.




### श्रावणधारा पाऊस

धडधड वारा पावसासवे नाच मांडतो
ढमढम ढमढम नभोमंडपी ढोल वाजतो

कडकड बिजली लखलख करते दिशांत सार्‍या
तिला अडवण्या समोर जाऊ नकोस वार्‍या

फडफड करती झाडांवरती रानपाखरे
रपरप पडती पंखांवरती थेंब टपोरे

थडथड करती उंच धबधबे कडेकपारी
थरथर होते वनात सार्‍या ऐन दुपारी

फुसांडती ते नदी सरोवर वाट वनाची
रस्ता अडला तगमग होते कुणा मनाची



-श्रीनिवास गडकरी,
रोहा

# तीन भावांची ओवाळणी बहिणींच्या खात्यात

## मंत्री आदिती तटकरे यांचे प्रतिपादन; मुख्यमंत्री लाडकी बहीण योजनेचे प्रमाणपत्र वाटप

**माणगाव : प्रतिनिधी**

राज्यातील तीन भावांनी रक्षाबंधनाच्या पूर्वसंध्येला राज्यातील आपल्या बहिणींच्या खात्यात ओवाळणी टाकल्याचा मनस्वी आनंद होत असल्याचे प्रतिपादन राज्याच्या महिला व बालविकासमंत्री आदिती तटकरे यांनी माणगाव येथील कार्यक्रमात बोलताना व्यक्त केले.



महाराष्ट्र शासन महिला व बालकल्याण विभाग अंतर्गत मुख्यमंत्री माझी लाडकी बहीण योजनेकरिता पात्र महिलांना प्रमाणपत्र वाटप कार्यक्रमाचे आयोजन शनिवारी (दि.१७) गांधी मेमोरियल हॉल या ठिकाणी राज्याच्या मंत्री आदिती तटकरे यांच्या हस्ते करण्यात आले होते.

या कार्क्रमास जिल्हा कार्यक्रम अधिकारी निर्मला कुचिक, माणगाव तहसीलदार दशरथ काळे, नायब तहसीलदार विपुल ढुमे, राष्ट्रवादी काँग्रेसचे तालुका अध्यक्ष सुभाष केकाणे, माजी सभापती संगीता बक्कम, युवक राष्ट्रवादी काँग्रेसचे जिल्हा कार्याध्यक्ष शादाब गैबी, माजी नगराध्यक्ष योगिता चव्हाण, राष्ट्रवादी शहर अध्यक्ष नितीन वाढवळ, नगरपंचायतीच्या महिला व बालकल्याण समिती सभापती सुविधा खैरे, नगरसेवक मनोज पवार, नगरसेविका ममता थोरे, माजी नगरसेवक हेमंत शेट, महिला आघाडी राष्ट्रवादी तालुका उपाध्यक्ष श्रद्धा यादव, युवा नेते सुमित काळे, साहिल गायकवाड, प्रवीण बागवे, सिद्धांत देसाई, सौरभ खैरे आदींसह अंगणवाडी सेविका, मदतनीस, आशा वर्कस व पात्र लाभार्थी महिला मोठ्या संख्येने उपस्थित होत्या.

मंत्री आदिती तटकरे पुढे म्हणाल्या की, आजचा दिवस आनंदाचा व समाधानाचा आहे. या योजनेबाबत विरोधक अफवा व गैरसमज पसरवत होते. ते सांगत होते ही योजना यशस्वी होऊ शकत नाही, पण महायुतीच्या सरकारने योजना यशस्वी करून दाखविली असून राज्यातील ३३ लाख महिलांच्या खात्यात १४ ऑगस्ट रोजी जुलै व ऑगस्ट या दोन महिन्यांचे तीन हजार रुपये जमा झाले असून १५ ऑगस्ट रोजीही अनेक महिलांच्या खात्यात हि रक्कम जमा झाली आहे. राज्यातील अडीच कोटी लाभार्थी महिलांना या योजनेचा लाभ मिळणार असून रायगड जिल्ह्यातील चार लाख लाभार्थी महिलांना आपण लाभ देत आहोत. राज्यातील कागदपत्रांची पूर्तता केलेल्या उर्वरित सर्व लाभार्थी महिलांना लाभ दिला जाणार आहे.

या योजनेची मंत्री म्हणून काम करताना मला अतिशय आनंद होतोय, कारण माणगावच्या याच हॉलमध्ये महिन्यापूर्वी आपले या योजनेबाबतचे शिबिर आयोजित करण्यात आले होते. त्यानंतर लगेचच दुसऱ्या महिन्यात रक्षाबंधनाच्या पूर्वसंध्येलाच महिलांच्या खात्यात रक्कम जमा झाल्याचे आनंद वाटत आहे. ज्यांच्याकडे भरपूर काही आहे त्यांना या गोष्टीचे महत्त्व नाही, पण ज्यांच्याकडे काही नाही अशा लोकांसाठी ही महत्वाची गोष्ट आहे, असे मंत्री तटकरे यांनी सांगत अजूनही ज्या कोणी महिलांनी या योजनेचे अर्ज भरले नसतील त्यांनी अर्ज भरावे यासाठी अर्जदारांनी आपला आधारकार्ड बँक खात्याशी लिंक करावा. जास्तीत जास्त महिलांनी या योजनेचा लाभ घ्यावा. महायुती सरकारच्या माध्यमातून सुरु करण्यात आलेली ही योजना कायमस्वरूपी सुरू ठेवण्याचा महायुती सरकारचा मानस आहे. कार्यक्रमाचे सूत्रसंचालन शिक्षिका अपूर्वा जंगम यांनी केले.

## निवडक

### रातवड विद्यालयात विद्यार्थ्यांचा सत्कार



**माणगाव** : तालुक्यातील माध्यमिक विद्यामंदिर रातवड विद्यालयात स्वातंत्र्य दिन उत्साहपूर्ण वातावरणात झाला. मुख्याध्यापक संतोष कदम यांच्या हस्ते ध्वजारोहण करण्यात आले. कार्यक्रमाचे संचालन क्रीडाशिक्षक श्रीकृष्ण गरधे यांनी केले. सामुहिक राष्ट्रगीत, ध्वजगीत, महाराष्ट्र गीत म्हणण्यात आले. यानिमित्ताने मार्च २०२४ शाळांत परीक्षेतील गुणवंत विद्यार्थ्यांचा शाळा व सामाजिक कार्यकर्ते भारत पालकर यांच्या वतीने सत्कार करण्यात आला. भारत पालकर यांनी त्यांचे वडील कै.दामोदर पालकर व नातेवाईक यांच्या स्मरणार्थ आठवी ते दहावीच्या विद्यार्थ्यांना रोख पारितोषिक देऊन गौरविले. कार्यक्रमास ठाणे येथील वकील अनुराधा परदेशी, शालेय समिती निमंत्रित सदस्य सतीश पवार, विद्यालयाचे मुख्याध्यापक संतोष कदम, सरपंच वैशाली जाधव, माजी सरपंच सुनंदा गायकवाड, सामजिक कार्यकर्ते उमेश साटम, ग्रामस्थ उपस्थित होते.

### भारती इंग्लिश स्कूलमध्ये ध्वजारोहण



**खोपोली** : साबळेपुरम वसाहतीतील भारती अकॅडमी इंग्लिश स्कूलमध्ये ध्वजारोहण उत्साहात करण्यात आले. या कार्यक्रमाला प्रमुख पाहुणे म्हणून युवा उद्योजक विक्रम साबळे उपस्थित होते. या वेळी विद्यार्थ्यांनी विविध कार्यक्रम सादर केले. कार्यक्रमाला विशेष अतिथी विवेक सिंग, मुख्याध्यापिका सुजाता महाराणा, हिना पेंढारी, स्नेहा रामटेकर त्याचप्रमाणे शिक्षक व विद्यार्थी उपस्थित होते. प्रमुख पाहुणे विक्रम साबळे यांनी, स्वातंत्र्यासाठी बलिदान देणाऱ्या शूरवीरांचे स्मरण करणे आमचे आद्य कर्तव्य आहे. मिळालेले स्वातंत्र्य टिकविणे भावी पिढीच्या हातात आहे, असे सांगितले.

### कॅनरा बँकेकडून विद्यार्थ्यांना शिष्यवृत्ती

**कर्जत** : राजिप कळंब येथील आदिवासी विद्यार्थ्यांना शैक्षणिक शिष्यवृत्ती देण्यात आली. बँक ऑफ कॅनराकडून ही शिष्यवृत्ती विद्यार्थ्यांच्या खात्यात जमा झाली आहे. कळंब शाळेतील विद्यार्थ्यांना शिष्यवृत्ती देण्याचा प्रस्ताव तेथील शिक्षक किशोर पाटील यांच्याकडून तयार करण्यात आला. तेथील सहा विद्यार्थ्यांचे प्रस्ताव मंजूर झाले होते. मुख्याध्यापक के. डी. राऊत यांचे हस्ते कॅनरा बँकेचे शाखा अधिकारी निलेश यादव आणि कळंब शाखेतील बँक कर्मचारी दिनेश पोसाटे यांचा सत्कार करण्यात आला. या वेळी शिक्षक किशोर पाटील, सहदेव चव्हाण आदी उपस्थित होते.




## नेरळमधील आदिवासी कार्यकर्ते शिवसेनेत



कर्जत : प्रतिनिधी

आमदार महेंद्र थोरवे यांच्या नेतृत्वावर विश्वास ठेवत नेरळ ग्रामपंचायत हद्दीतील आनंदवाडी व कोमलवाडीमधील आदिवासी ग्रामस्थांनी शिवसेनेत जाहीर प्रवेश केला.

बाळासाहेब भवनातील आमदार महेंद्र थोरवे यांच्या जनसंपर्क कार्यालयामध्ये नेरळ ग्रामपंचायतमधील कार्यकर्त्यांचा प्रवेश झाला. कल्पेश देशमुख आणि गौरंग वाघेला यांच्या नेतृत्वाखाली नरेश शिंगवा, अजय शिंगवा, अविनाश शिंगवा, कल्पेश उघडा, रोहन कसाळी, जीवन पादीर, लक्ष्मण शिंगवा, करण बंगाळे, प्रमोद शिंगवा, महेंद्र वाघ, महेंद्र निरगुडा, प्रवीण शिंगवा, केतन पिरकड, राज शिंगवा, महेश उघडा, दीपक ठोंबरे, रवी शिंगवा, राहुल पारधी,दिलीप उघडा, हरेश उघडा, देवेंद्र शिंगवा, कैलास डुमणे, अविनाश शिंगवा, रवी सुतक, रोहिदास सुपे,गणेश कोकाटे, विजय पवार, पवन निरगुडा, यशवंत निरगुडा, अंकुश शिंगवा, मनोज निरगुडा यांनी शिवसेनेत प्रवेश केला.

या कार्यक्रमास शिवसेना जिल्हाप्रमुख संतोष भोईर, उपतालुका संघटक नेरळ शहर प्रमुख प्रभाकर देशमुख, शहर संघटक केतन पोतदार तसेच सुरेश राणे आदी पदाधिकारी आणि कार्यकर्ते उपस्थित होते.

## घोड्यावरून पडून पर्यटक जखमी

**अलिबाग** : येथील समुद्र किनारी फिरायला आलेला एक पर्यटक घोड्यावरून पडल्याने गंभीर जखमी झाला आहे. त्याला अलिबाग जिल्हा रुग्णालयात दाखल करण्यात आले आहे. मयुर खानकल असे जखमी पर्यटकाचे नाव आहे.

घोडसवारी करताना घोडा अचानक उधळल्याने मयुर खाली पडला. त्याच्या डोक्याला गंभीर दुखापत झाली. त्यामुळे त्याला जिल्हा सामान्य रुग्णालयात दाखल करण्यात आले असून, त्याची प्रकृती चिंताजनक आहे. पुढील उपचारासाठी त्याला मुंबईत हलविण्यात येणार असल्याची माहिती जिल्हा शल्यचिकीत्सक अंबादास देवमाने यांनी दिली.

## कर्जतमध्ये महिलेच्या गळ्यातील मंगळसूत्र आणि चेन पळवली

**कर्जत : प्रतिनिधी**

कर्जतमध्ये सामसूम रस्त्याचा फायदा उठवत रात्रीच्या वेळी नातीसह फिरायला गेलेल्या महिलेच्या गळ्यातील मंगळसूत्र व सोन्याची चेन अज्ञात चोरट्याने दुचाकीवरून येऊन पळवली. ही घटना स्वातंत्र्य दिनी रात्री १०.३०च्या सुमारास घडली.

कर्जत पालिका क्षेत्रातील विठ्ठल नगर परिसरात माऊली को. ऑप. हाउसिंग सोसायटीमध्ये राहणाऱ्या उर्मिला लक्ष्मण सोनवणे व त्यांचे पती रात्री नातीस फिरावयाला घेऊन गेले होते. पती नातीला घेऊन पुढे चालत होते व पत्नी उर्मिला सोनावणे या मागून चालल्या होत्या. सामसूम रस्त्याचा फायदा उठवत दुचाकीवर आलेल्या अज्ञात चोरट्याने त्यांच्या गळ्यातील मंगळसूत्र व सोन्याची चेन खेचून पलायन केले. विठ्ठलनगर परिसरातील भाऊसाहेब राऊत चौक ते अभिनव ज्ञानमंदिरकडे जाणाऱ्या रस्त्यावर भरवस्तीत ही घटना घडल्याने नागरिकांत भीतीचे वातावरण पसरले आहे.

## खालापुरातील दोन पोलिसांना पदक

**खोपोली : प्रतिनिधी**

आयएसओ ९००० मानांकनप्राप्त खालापूर पोलीस ठाण्यातील उपनिरीक्षक शिवाजी गोविंद जुंदरे यांना उल्लेखनीय सेवेबद्दल राष्ट्रपती पोलीस पदक आणि सहाय्यक निरीक्षक अभिजित अरविंद भुजबळ यांना विशेष सेवा पदक मिळाले आहे.




खालापूर पोलीस ठाण्यात कार्यरत उपनिरीक्षक शिवाजी जुंदरे यांना पदक मिळाले आहे. जुंदरे हे सन १९९०मध्ये नाशिक जिल्ह्यातील पोलीस कॉन्स्टेबल म्हणून भरती झालेले असून सन २०२३मध्ये खात्यातंर्गत परीक्षेतून उपनिरीक्षक म्हणून पदोन्नत झालेले आहेत. ते अत्यंत कार्यकुशल असून त्यांनी गुन्हे तपासात एक वेगळी ओळख निर्माण केलेली आहे.

विशेष सेवा पदकप्राप्त सहाय्यक पोलीस निरीक्षक अभिजित भुजबळ यांनी सन २०२० ते २०२४मध्ये आंतरराज्यीय न्यू बेस कॅम्प मुरकुटडोह, गोंदिया येथे नक्षलग्रस्त विभागात चार वर्षे सेवा पूर्ण केल्याबद्दल विशेष सेवा पदक मंजूर देण्यात आलेले आहे.

## काशीद समुद्र किनारा पर्यटकांसाठी खुला

**मुरुड : प्रतिनिधी**

मुरुड तालुक्यातील प्रसिद्ध काशीद समुद्र किनारा पर्यटकांसाठी खुला करण्यात आला आहे. पावसाळी १ जून ते १५ ऑगस्ट या कालावधीत हा समुद्र किनारा पर्यटकांसाठी बंद करण्यात आला होती. या दरम्यान किनारी असणारे स्टॉलसुद्धा बंद होते. १५ ऑगस्टनंतर पाऊस कमी झाल्याने काशीद ग्रामपंचायतीने समुद्र किनारा खुला केला आहे.



काशीद समुद्र किनारा खूप आवडत असल्याने दर वर्षाला सात लाखपेक्षा जास्त पर्यटक या ठिकाणी भेट देत असतात.निळेक्षार समुद्राचे पाणी, पांढऱ्या रंगाची वाळू व किनारी सुरूच्या झाडांची दाट वस्ती असल्याने सर्व ठिकाणी सावली पर्यटकांना मिळत असते. शनिवार-रविवारी मोठ्या संख्येने पर्यटक येथे येत असतात. त्यामुळे स्थानिक लोकांना मोठा व्यवसायही प्राप्त होत असतो.

सध्या काशीद किनारा खुला जरी झाला असला तरी पर्यटक फार तुरळकच येत आहेत. तरीसुद्धा पर्यटकांना विविध सेवा देण्यासाठी सर्व स्टॉलधारक तयार झाले असून सेवा देत आहेत.

याबाबत काशीद ग्रामपंचायत सरपंच संतोष राणे यांनी सांगितले की, काशीद समुद्र किनारा पर्यटकांसाठी खुला केला असून ग्रामपंचायत कर्मचाऱ्यांकडून किनारा स्वच्छ करण्यात आला आहे. पर्यटकांना विविध सेवा देण्यासाठी ४७ स्टॉलधारक सज्ज झाले आहेत. येणाऱ्या पर्यटकांनी समुद्रात पोहणे सध्या तरी टाळावे, कारण पावसाळा असल्याने पाण्याचा प्रवाह जोरदार सुरू आहे. पर्यटकांनी आपल्या जीविताची काळजी घ्यावी.

## जिल्हा कारागृहात संगीत कार्यक्रमातून कैद्यांचे मनोरंजन

**अलिबाग : वार्ताहर**

कोणीही गुन्हेगार म्हणून जन्म घेत नाही. परिस्थिती, संगत आणि स्वभाव यामुळे काहीजण जाणते-अजाणतेपणातून कृत्य करून शिक्षेस पात्र ठरतात. अशा कैद्यांवर संस्कार घडविण्याचे काम कारागृह अधीक्षक, निरीक्षक करीत असतात. याचा अनुभव अलिबाग येथील जिल्हा कारागृहात आयोजित कार्यक्रमातून आला. १५ ऑगस्टच्या पार्श्वूमीवर कारागृहात एका संगीत कार्यक्रमाचे आयोजन करण्यात आले होते. त्यातून कैद्यांचे मनोरंजन हा उद्देश होता असे कारागृहाचे वरिष्ठ तुरुंगाधिकारी रामचंद्र रणनवरे यांनी सांगितले. तुरुंग अधीक्षक अशोक कारकर यांच्या मार्गदर्शनाखाली हा कार्यक्रम घेण्यात आला.



स्वातंत्र्य दिन सोहळा साजरा झाल्यानंतर कारागृहाच्या माध्यमातून आयोजित संगीत कार्यक्रमात जनजीवन विद्या मिशनच्या सभासदांनी प्रार्थना, स्फूर्ती गीत, भजन सादर करून जीवनात कसे वागावे, आपल्या जगण्याचा मूळ उद्देश काय? हे सांगितले. सर्वांना सुखात, आनंदात ठेवण्याची प्रार्थना ईश्वराकडे केली. त्यांच्या या प्रार्थनेतून संस्कार घडविण्याचे प्रयत्न झाले. देशाविषयी आदर राखावा असा संदेशही त्यांनी दिला. यात जीवन विद्या मिशनचे शैलेश मते, सुरेश म्हात्रे, जयेश सानकर, केदार म्हात्रे, रसिका शिंदे, जुईली टोळकर, वैशाली घरत यांचा सहभाग होता.

या वेळी तुरूंग अधिकारी शशिकांत निकम, किशोर वारणे, सुभेदार देवसाल शिरसाट, विलास इंगळे आणि कर्मचारी उपस्थित होते. अलिबागेतील उदयोन्मुख गायिका मोनिका पाटील-सालावकर, तुरूंग अधिकारी शशिकांत निकम, महावितरणचे अभियंता विशाल सुर्यवंशी यांनी देशभक्तीपर आणि इतर गाणी सादर करून कैद्यांना आनंद दिला. कैद्यांनीदेखील टाळ्यांची साद देत कार्यक्रमात आपला सहभाग नोंदवला. या कार्यक्रमामुळे त्यांच्या चेहऱ्यावर समाधान, आनंद दिसून येत होता.

या वेळी चंद्रकांत म्हात्रे या कैद्याने स्वरचीत गीत सादर केले. या गीतातून त्याने कारागृह अधीक्षक, वरिष्ठ तुरूंग अधिकारी, तुरूंग अधिकारी आणि कर्मचाऱ्यांनी कैद्यांना दिलेली चांगली वागणूक, कारागृहातील सकारात्मक बदल याचे गोडवे गायले. त्याच्या या उत्स्फूर्त गीताने सारेच भारावून गेले. या संगीत कार्यक्रमामुळे आम्हाला खूपच आनंद वाटला, अशी प्रतिक्रिया कैद्यांनी व्यक्त केली.

## आकार प्रतिष्ठान राबवणार उपक्रम

**पोलादपूर : प्रतिनिधी**

तालुक्यातील हुशार-गरीब विद्यार्थ्यांना उच्च शिक्षणासाठी मदत करण्याचा निर्णय आकार प्रतिष्ठानचे अध्यक्ष अजय सलागरे यांच्या अध्यक्षतेखालील कापडे बुद्रुक येथे झालेल्या प्रतिष्ठानच्या त्रैमासिक सभेत घेण्यात आला.

आकार प्रतिष्ठानमार्फत पुढील काही महिन्यांत विविध शैक्षणिक व सामाजिक उपक्रम राबविण्यात येणार आहेत. ऑक्टोबरमध्ये विद्यार्थ्यांसाठी एक दिवसीय करिअर मार्गदर्शनवर्गाचे आयोजन केले जाणार असून डिसेंबरमध्ये विविध क्षेत्रात काम करणाऱ्या ११ मान्यवरांना पुरस्कार देऊन गौरविण्यात येणार आहे. ज्येष्ठ नागरिक मेळावा, माजी सैनिक सन्मान मेळावा असे उपक्रमही राबविले जाणार आहेत.

या सभेस उपाध्यक्ष रामदास सकपाळ, सचिव राजाराम शेलार, खजिनदार रविकांत सकपाळ, ज्येष्ठ विश्वस्त अजित जंगम, ज्ञानेश्वर सकपाळ व अमर सलागरे उपस्थित होते.

## धाटाव येथील डीएमसी कंपनीत विविध कार्यक्रम

**रोहे : प्रतिनिधी**

धाटाव औद्योगिक क्षेत्रातील डीएमसीसी कंपनीत विविध कार्यक्रमांनी स्वातंत्र्य दिन उत्साहात साजरा करण्यात आला. कंपनीच्या प्रांगणात झेंडावंदन कंपनीचे सिनियर व्हाईस प्रेसिडेंट संभाजीराव जाधव यांच्या हस्ते, कंपनीचे डायरेक्टर कुलदीप तिवारी, डेप्युटी जनरल मॅनजर किरण हिंगणे यांच्या प्रमुख उपस्थितीत करण्यात आले.

या वेळी एच.आर.मॅनेजर अनिल जांभळे, क्यु.ए.मॅनेजर डॉ. संदिप गांगल, कामगार प्रतिनिधी उमेश वादळ यांची भाषणे झाली. कंपनीतील कर्मचारी राकेश खांडेकर, निलेश शेडगे, प्राची म्हात्रे, नवनाथ घोरपडे यांनी समूह देशभक्तीपर गीत व सेफ्टी मॅनेजर अरुण माने यांनी देशभक्तीपर गीत गायले.

कंपनीत वर्षभरात कामगार कर्मचाऱ्यांसाठी सुरक्षा सप्ताहानिमित्त आयोजित स्पर्धेतील विजेत्यांना या वेळी बक्षीसे देण्यात आली. इयत्ता १० वी व १२ वीमध्ये उत्तीर्ण विद्यार्थ्यांचा सत्कार करण्यात आला. कार्यक्रमाचे नियोजन कंपनीचे पर्सनल मॅनेजर अनिल जांभळे यांनी उत्कृष्ट केले. कार्यक्रम यशस्वी करण्यासाठी पर्सनल विभागाचे राकेश खांडेकर, केतन पवार, अनिकेत पाटील, निलेश शेडगे, स्मिता परातणे, अल्पेश भोय यांनी विशेष सहकार्य केले.



# महिला टी-२० वर्ल्डकप झिम्बाब्वेत?

## बांगलादेशमधील निदर्शनांमुळे ठिकाण बदलले जाण्याची शक्यता

**नवी दिल्ली : वृत्तसंस्था**

महिला टी-२० विश्वचषक स्पर्धा यंदा बांगलादेशमध्ये होणार आहे, मात्र बांगलादेशातील राजकीय निदर्शनांमुळे सुरक्षेच्या कारणास्तव टी-२० विश्वचषकाचे ठिकाण बदलले जाण्याची शक्यता आहे. स्पर्धा ३ ऑक्टोबरपासून खेळली जाणार आहे. अशा परिस्थितीत यंदाच्या महिला टी-२० विश्वचषकाच्या यजमानपदाचा दावा अशा एका देशाने केला आहे, ज्याच्या नावाची जोरदार चर्चा सुरू आहे. हा देश दुसरा कोणी नसून झिम्बाब्वे आहे.

झिम्बाब्वे हा यजमानपदासाठी प्रमुख पर्याय म्हणून पुढे आला आहे. युएईकडेही पर्याय म्हणून पाहिले जात आहे. २० ऑगस्ट रोजी आयसीसी बोर्ड याबाबत निर्णय घेऊ शकते. झिम्बाब्वेने गेल्या काही वर्षांत (२०१८ आणि २०२३) दोन एकदिवसीय विश्वचषक पात्रता फेरीचे यशस्वी आयोजन केले आहे. त्यानंतर झिम्बाब्वेने स्वत:ला मोठ्या क्रिकेट स्पर्धांचे संभाव्य ठिकाण म्हणून स्थापित केले आहे. झिम्बाब्वेने २००३मध्ये दक्षिण आफ्रिका आणि केनियासह शेवटच्या वेळी विश्वचषकाचे आयोजन केले होते. तेव्हापासून झिम्बाब्वेसमोर अनेक आव्हाने आहेत. रॉबर्ट मुगाबे यांच्या राजवटीचा समावेश, अति चलनवाढ यामुळे त्यांना महत्त्वाच्या क्रिकेट स्पर्धांपासून दूर ठेवण्यात आले.

झिम्बाब्वेने अलिकडच्या वर्षांत क्रिकेट जगतात पुनरागमन केले आहे आणि आता महिला टी-२० विश्वचषक आयोजित करण्यास उत्सुक आहे, मात्र झिम्बाब्वेचा महिला क्रिकेट संघ कधीही विश्वचषकात सहभागी झालेला नाही आणि यंदाही स्पर्धेत सहभागी होणार नाही. असे असले तरी झिम्बाब्वेने नवीन यजमान म्हणून स्वत:ला सिद्ध करण्यास उत्साह दाखवला आहे. झिम्बाब्वे २०२६मध्ये नामिबियासोबत पुरुष अंडर-१९ विश्वचषक आणि २०२७मध्ये दक्षिण आफ्रिका आणि नामिबियासोबत एकदिवसीय विश्वचषक सह-यजमान असेल. दरम्यान, झिम्बाब्वे क्रिकेट आणि स्थानिक सरकार व्हिक्टोरिया फॉल्स आणि मुतारे येथे काम करत आहेत.

भारत आणि श्रीलंकेने हवामानामुळे यजमानपद न भूषवण्याचा निर्णय घेतला आहे. झिम्बाब्वेला आशा आहे की त्यांनी आयोजित केलेल्या स्पर्धेचा खर्च यूएईच्या तुलनेत कमी असेल. यामुळे अंतिम निर्णयात त्यांना फायदा मिळू शकेल. झिम्बाब्वेची क्षमता पाहता १० हजार प्रेक्षक क्षमता असलेल्या ठिकाणी त्यांना चांगली गर्दी खेचण्याची संधी आहे, ज्याचा एक महत्त्वपूर्ण फायदा होऊ शकतो.

### हवामानदेखील अनुकूल

सध्या झिम्बाब्वे हरारे स्पोर्ट्स क्लब आणि बुलावायो येथील क्वीन्स स्पोर्ट्स क्लब २०२४ महिला टी-२० विश्वचषक स्पर्धेसाठी संभाव्य यजमान म्हणून मैदानात उतरत आहे. या मैदानांवर नुकतेच २०२३च्या विश्वचषक पात्रता सामन्यांचे आयोजन करण्यात आले होते. ऑक्टोबरमधील झिम्बाब्वेचे हवामानदेखील या स्पर्धेसाठी अनुकूल मानले जाते, कारण त्या वेळी देशात अधिक गरम असते आणि पावसाची शक्यता कमी असते.

# विनेश फोगट मायदेशी परतली, जोरदार स्वागत



**नवी दिल्ली : वृत्तसंस्था**

पॅरिस ऑलिम्पिकच्या फायनलला मुकलेल्या विनेश फोगटचे शनिवारी (दि. १७) भारतात आगमन झाले. दिल्ली विमानतळावरून बाहेर आल्यानंतर तिथे आलेल्या चाहत्यांनी विनेशचे जोरदार स्वागत केले. हे पाहून विनेश फोगटला अश्रू अनावर झाले, ज्याचा व्हिडीओ व्हायरल होत आहे.

सुवर्णपदकाच्या लढतीपूर्वी विनेशला अपात्र ठरवण्यात आले होते. महिलांच्या ५० किलो वजनी गटाच्या कुस्तीच्या सामन्यापूर्वी १०० ग्रॅम जास्त वजनामुळे ती अपात्र ठरली होता. भारतीय ऑलिम्पिक संघटनेने यावर तीव्र आक्षेप नोंदवला होता. या प्रकरणाबाबत विनेशने सामायिक रौप्यपदक देण्यासाठी क्रीडा लवादाच्या न्यायालयाकडेही अपील केले होते, पण १४ ऑगस्ट रोजी संध्याकाळी तिची याचिका सीएएसने फेटाळली. पॅरिस ऑलिम्पिकमध्ये सहभागी होऊन विनेश फोगट जेव्हा मायदेशी परतली तेव्हा दिल्ली विमानतळाबाहेर तिचे स्वागत करण्यासाठी बजरंग पुनिया, साक्षी मलिक आणि इतर अनेक कुस्तीपटूही उपस्थित होते. याशिवाय विनेशचे कुटुंबीयही उपस्थित होते.

विनेश हरियाणातील तिच्या मूळ गावी बलाली येथे पोहचताच सर्वांनी मने जिंकली. तिने तिच्या गावी उपस्थितांशी बोलताना सांगितले की, त्यांनी मला सुवर्णपदक दिले नाही म्हणून काय झाले. मला माझ्या माणसांनी गोल्ड देऊन माझा सत्कार केला. हे गोल्ड, हा सन्मान आणि हा आदर यापुढे हजार सुवर्णपदके फिकी आहेत.

# सॉफ्ट टेनिस अजिंक्यपद स्पर्धेत उलवेतील एसएनजी स्कूल चॅम्पियन



**पनवेल : रामप्रहर वृत्त**

तिसरी जिल्हास्तरीय सॉफ्ट टेनिस अजिंक्यपद स्पर्धा ११ ऑगस्ट रोजी सीबीसी बेलापूर येथील विद्या उत्कर्ष मंडळ टेनिस कोर्ट या ठिकाणी आयोजित करण्यात आली होती. स्पर्धेत प्रथम चॅम्पियनशिप एसएनजी इंटरनॅशनल स्कूल उलवे, द्वितीय सेंट मेरीस स्कूल वाशी, तृतीय पनवेल आणि किंग मार्शल आर्ट अकॅडमी खांदा कॉलनी यांनी पटकावली.

स्पर्धेचे उद्घाटन सेंट मेरीस स्कूल चे वरिष्ठ शिक्षक अनंत चव्हाण यांच्या हस्ते झाले. स्पर्धेत रायगड जिल्ह्यातील सॉफ्ट टेनिस खेळाडूंनी सहभाग नोंदवला होता.

सब ज्युनिअर मुली गटात टीम इव्हेंटमध्ये प्रथम क्रमांक एसएनजी इंटरनॅशनल स्कूल, द्वितीय सेंट मेरीस स्कूल, तृतीय किंग मार्शल आर्ट; सब ज्युनिअर मुले गटात प्रथम क्रमांक सेंट मेरीस स्कूल, द्वितीय एसएनजी इंटरनॅशनल स्कूल, तृतीय क्रमांक किंग मार्शल आर्टने प्राप्त केला. ज्युनिअर मुली गटात प्रथम क्रमांक सेंट मेरीस, द्वितीय एसएनजी इंटरनॅशनल स्कूल, तृतीय किंग मार्शल आर्ट; तर मुलांच्या गटात प्रथम क्रमांक पनवेल अकॅडमी, द्वितीय एसएनजी इंटरनॅशनल स्कूल, तृतीय क्रमांक सेंट मेरीस स्कूलने प्राप्त केला आहे.

सब ज्युनिअर मुली सिंगल इव्हेंटमध्ये प्रथम क्रमांक इरा आयांथन, द्वितीय पलक कुमार, तृतीय रिया ननावरे व सुष्टी; मुलांमध्ये प्रथम क्रमांक स्पर्श पाटील, द्वितीय माधव म., तृतीय क्रमांक अमन अली आणि देवेंद्र चव्हाण यांनी प्राप्त केला आहे. ज्युनिअर मुली सिंगल इव्हेंटमध्ये प्रथम क्रमांक इरा आयांथन, द्वितीय पलक कुमार, तृतीय प्रतीक्षा पुरतंगेरी आणि समिक्षा शेरकर; मुलांमध्ये प्रथम क्रमांक अश्विन प्रभू, द्वितीय स्पर्श पाटील, तृतीय क्रमांक ऋषिकेश आणि देवेंद्र चव्हाण यांनी प्राप्त केला आहे.

या अजिंक्यपद स्पर्धेतून निवड झालेले प्राविण्यप्राप्त खेळाडू राज्यस्तरीय स्पर्धेत रायगड जिल्हा संघाचे प्रतिनिधित्व करणार आहेत. सर्व खेळाडूंना रायगड सॉफ्ट टेनिस असोसिएशनच्या अध्यक्ष, माजी उपमहापौर सीताताई पाटील, उपाध्यक्ष सुजाता वारंगे, सचिव स्वप्नील वारंगे, कार्याध्यक्ष व आगरी शिक्षण संस्थेचे मुख्याध्यापक पंकज भगत, क्रीडा मार्गदर्शक (माणगाव) संजय गमरे, सेंट मेरीस ज्युनिअर कॉलेजचे क्रीडा शिक्षक सुहास कांबळे, टेक्निकल डायरेक्टर व राष्ट्रीय खेळाडू प्रतीक्षा शेरकर, पंच काजल मंडल व यश वारके, एसएनजी इंटरनॅशनल स्कूल उलवेचे क्रीडा शिक्षक शैलेश पाटील व बंडू आदींनी उपस्थित राहून सर्व खेळाडूंना शुभेच्छा दिल्या.

# चौल येथील जिल्हास्तरीय जलतरण स्पर्धेत रोहित कुथे अव्वल



**रेवदंडा : प्रतिनिधी**

चौल येथील श्री रामेश्वर पुष्करणीत आयोजित पोहण्याच्या जिल्हास्तरीय खुल्या स्पर्धेत रोहित कुथे याने प्रथम क्रमांक पटकाविला. व्दितीय क्रमांक सार्थक कुथे, तृतीय प्रेम पाटील व चतुर्थ क्रमांक सुजल भोये यांनी मिळविला.

प्रतिवर्षाप्रमाणे यंदाही स्वातंत्र्य दिनी रामेश्वर मित्र मंडळाच्या वतीने जिल्हास्तरीय खुल्या जलतरण स्पर्धेचे आयोजन करण्यात आले होते. स्पर्धा एकूण १२ गटामध्ये खेळविण्यात आली. गट १मध्ये प्रथम क्रमांक रूद्र विलास जाधव, व्दितीय आर्तिक भोईर, तृतीय राजन संदेश पाटील; गट २मध्ये प्रथम रोहित कुथे, व्दितीय दिनांशु कुथे, तृतीय वेदांत शिंदे; गट ३मध्ये प्रथम जय कोळी, व्दितीय श्लोक पाटील, तृतीय श्रवण कुथे; गट ४मध्ये प्रथम प्रेम पाटील, व्दितीय सार्थक इंद्रे, तृतीय सुजल भोये; गट ५मध्ये प्रथम आरोही नितीन नाईक, व्दितीय आर्वी अभिजीत घरत, तृतीय मिष्ठी नरेंद्र राऊळ; गट ६मध्ये प्रथम सोहम सुनील घरत, व्दितीय रूद्ध किशोर मानकर, तृतीय ऋषभ अमर वाडकर; गट ७मध्ये प्रथम प्रेषिता राम पाटील, व्दितीय जान्हवी रूपेश पाटील, तृतीय सई संजय पिळणकर; गट ८मध्ये प्रथम नाठ्या निलेश नाईक, व्दितीय सई संजय पाटील, तृतीय आदिश्री हेमंत जाधव; गट ९मध्ये प्रथम आरूष म्हात्रे, व्दितीय नीरव सागर वर्तक, तृतीय आर्य मानकर; गट १०मध्ये प्रथम दिनांशू कुथे, व्दितीय कृतक लाडगे, तृतीय हर्ष दाहीगडे, गट ११मध्ये प्रथम जितेंद्र रामचंद्र जाधव, व्दितीय विनायक यशवंत नाईक, तृतीय ऋषिकेश मोहन घरत आणि फायनल गट १२मध्ये रोहित कुथे प्रथम, व्दितीय सार्थक कुथे, तृतीय प्रेम पाटील व चतुर्थ क्रमांक सुजल भोये याने पटकाविला.

# ध्रुवी खाडे जलतरण स्पर्धेत पहिली



**माणगाव : प्रतिनिधी**

स्वातंत्र्य दिनी उरण येथे नगर परिषद, महेश बालदी मित्र मंडळ आणि हौशी जलतरण संघटना यांच्या संयुक्त विद्यमाने जलतरण स्पर्धेचे आयोजन करण्यात आले होते. या स्पर्धेत लीड स्कूल, मुगवली (माणगाव) येथील विद्यार्थ्यांनी सहभागी होत यश मिळविले.

यामध्ये ध्रुवी राजेंद्र खाडे हिने १४ वर्षाखालील गटातील ५० मिटर बटरफ्लाय या जलतरण प्रकारात सुवर्णपदक, तर ५० मीटर फ्री स्टाइल, ५० मीटर ब्रेस्टस्ट्रोक, ५० मीटर बॅकस्ट्रोक या प्रकारात रौप्यपदक जिंकले. १० वर्षाखालील गटात ५० मीटर फ्रीस्टाइलमध्ये हिरल संजोग शेठ हिने रौप्यपदक प्राप्त केले. या सर्व जलतरणपटूंना आंतरराष्ट्रीय जलतरण खेळाडू तथा प्रशिक्षक अभिनंदन तानाजी दळवी यांच प्रशिक्षण लाभले. याकरिता भादावमधील मंगेश निंबाळकर यांनी त्यांचा स्विमिंग पूल मुलांना जलतरणाकरिता उपलब्ध करून दिला होता.

# कराटे चॅम्पियनशिपला पनवेलमध्ये प्रतिसाद

**पनवेल : वार्ताहर**

गुरू अकादमी पनवेल आणि कराटे फेडरेशन ऑफ इंडिया यांच्या संयुक्त विद्यमाने पनवेल येथे ऑल इंडिया ओपन कराटे चॅम्पियनशिपचे आयोजन करण्यात आले होते. यात महाराष्ट्रातून सुमारे २५० कराटे स्पर्धकांनी सहभाग घेतला.

या स्पर्धेत खेळाडूंनी कराटेच्या वेगवेगळ्या गटांमध्ये पदके मिळवली. गुरू कराटे अकॅडमीचे संचालक, आंतरराष्ट्रीय-राष्ट्रीय खेळाडू, कोफुकन शितो-रयू कराटे स्कूल इंडियाचे तांत्रिक संचालक, आशियाई कराटे फेडरेशनचे शिहान अतुल पोतदार यांचा आमच्या यशात मोठा वाटा असल्याचे खेळाडूंनी सांगितले



# समित द्रविडच्या षटकाराने वेधले लक्ष

**बंगळुरू** : भारताचा माजी मुख्य प्रशिक्षक राहुल द्रविडचा मुलगा समित याने महाराजा टी-२० केएससीए स्पर्धेत असा एक उत्तुंग षटकार मारला, ज्याने डोळ्यांचे पारणे फेडले. याचा व्हिडीओ सोशल मीडियावर व्हायरल झाला आहे. समितने म्हैसूर वॉरियर्सकडून खेळताना बंगळुरू ब्लास्टर्सविरुद्धच्या सामन्यात एक लांबलचक षटकार ठोकला आणि आपली फलंदाजीची चमक दाखवली. समितने हा शॉट खडे-खडे मारला. यानंतर सोशल मीडियावर कौतुकाचा वर्षाव सुरू झाला आणि कमेंट्सचा महापूर आला.




# शॉटगन चॅम्पियनशिपमध्ये पनवेलच्या आर्या पाटीलला दोन पदके

**पनवेल : वार्ताहर**

नॅशनल रायफल असोसिएशन ऑफ इंडियातर्फे पंजाबमधील पटियाला येथे इंडिया ओपन शॉटगन चॅम्पियनशिपचे नुकतेच आयोजन करण्यात आले होते. या स्पर्धेत विविध राज्यांतून शेकडो शॉटगन शूटर सहभागी झाले होते. यामध्ये पनवेलची नेमबाज आर्या अभिजित पाटील हिने रौप्य व कांस्य अशी दोन पदके पटकावली. तिची राष्ट्रीय फेरीसाठी निवड झाली आहे.

आर्या ही जे.बी. कुसाळे रायफल शुटींग फाउंडेशनमध्ये नेमबाजीचे प्रशिक्षण घेत आहे. तिला आंतरराष्ट्रीय नेमबाजी प्रशिक्षक तेजस कुसाळे यांचे मार्गदर्शन लाभत आहे. शूटिंग स्पर्धेच्या थरारक फेरीत कुसाळे शूटिंग फाऊंडेशनच्या विद्यार्थ्यांनी बाजी मारली असून अब्दुल हमीद मिरशिकारी यांनीही रौप्यपदक पटकावले. आर्या व अब्दुल यांचे यशाबद्दल अभिनंदन होत आहे.










**पनवेल : आगामी विधानसभा निवडणुकीच्या पार्श्वभूमीवर भाजप पनवेल शहर विस्तारित कार्यकारिणीची बैठक खांदा कॉलनीतील श्रीकृपा हॉलमध्ये आमदार प्रशांत ठाकूर यांच्या प्रमुख उपस्थितीत आणि शहर अध्यक्ष अनिल भगत यांच्या अध्यक्षतेखाली झाली.**

दैनिक राम प्रहर या वृत्तपत्रातून प्रसिद्ध होणाऱ्या जाहिरातीतील सेवा, उत्पादने अथवा त्यासंदर्भातील कोणत्याही दाव्यांची वा उपयोगाची कोणतीही हमी वा जबाबदारी मल्हार नेटवर्क प्रा. लि. अंतर्गत दैनिक राम प्रहर घेणार नाही. दैनिक राम प्रहर या वृत्तपत्रातून प्रसिद्ध होणाऱ्या विविध जाहिरातींची खातरजमा व शहानिशा वाचकांनीच करून संबंधितांशी व्यवहार करावेत. त्यासंदर्भात प्रसिद्ध झालेल्या दाव्यांच्या पूर्ततेची, तसेच कोणत्याही मजकुराची कोणतीही हमी वा जबाबदारी मल्हार नेटवर्क प्रा. लि. अंतर्गत दैनिक राम प्रहरचे मुद्रक, प्रकाशक, संपादक वा मुख्य संपादक यांच्यावर राहणार नाही, याची दैनिक राम प्रहरच्या वाचकांनी आणि जाहिरातदारांनी नोंद घ्यावी. **–मुख्य संपादक**

हे पत्र मालक मल्हार नेटवर्क प्रा. लि. करिता मुद्रक, प्रकाशक कृष्णा चांगू ठाकूर यांनी सिद्धकला प्रिंट मीडिया अ‍ॅण्ड पब्लिकेशन्स प्रा. लि., डब्ल्यू २३० टीटीसी इंडस्ट्रियल एरिया, एमआयडीसी, ठाणे-बेलापूर रोड, कोपरखैरणे, नवी मुंबई ४०० ७१० येथे छापून अस्पायर प्राईड, गाळा नं. ४, रुपाली चौक, पनवेल. ४१० २०६. रायगड येथून प्रकाशित केले. RNI Regn. No. MAH MAR/2008/26534, **मुख्य संपादक : देवदास मटाले**. पोस्टल परवाना क्र. एनएमबी/१२०/२०२०-२२. कार्यालय संपर्क : दूरध्वनी ०२२-२७४८०१००, २७४९०१०० e-mail : ramprahar@gmail.com